ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

सप्टेंबर २०१०     मूल्य १० रुपये

## सुर्वे नारायणाचा अस्त



## ऋतुसंहार कलाप्रदर्शन



षांताराम पवार

वृक्षगणांचे कणे मोडले
बघ मातीचे दहन जाहले
हवापाणीही विषार बनले
जंगलवासी मूठभर उरले

निसर्गहानी अशी अनावर
चराचराला शाप भयंकर
मानवा! थांबव ऋतुसंहार
स्मरोनी ब्रह्माचे उपकार

शामल धरती फुलफळू दे
हिरवेपिवळे उभे डोलू दे
ऊनपावसा रंग खेळू दे
जिवाशिवाला हसूनाचू दे

मानवा! थांबव ऋतुसंहार
स्मरोनी ब्रह्माचे उपकार.


इति षांताराम



अरुण काळे



सुनील महाडिक



षांताराम पवार

RUCHEE Regd. MH/MR/WEST/79/2009-2011
RNI NO - 428 / 1987
POSTED AT MUMBAI PATRIKA CHANNEL STG OFFICE. MBI - 40

## श्रीमद् भागवत या ग्रंथाचे प्रथमच मराठी समश्लोकी रूपांतर प्रसिद्ध




प्रकाशनसमयी प्रभाकर भिडे, डॉ. यशवंत पाठक, ज्योतिर्भास्कर जयंत साळगावकर, समश्लोकीकार प्रा. सत्यसंध वर्वे आणि डॉ. आरती दातार

**पाच खंड – जवळपास १८०० पाने**

**मूळ किंमत २००० रुपये घरपोच १२०० रुपयांत**


---

## दीर्घायुष्य शाप की वरदान? या प्रश्नाचा आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन आणि ज्येष्ठत्वाची शान राखत जगण्यासाठी ज्येष्ठांनी प्रयत्नशील असायला हवे यांचे विवेचन करणारी दोन महत्त्वपूर्ण पुस्तके




### वृद्धत्वाची शान
पद्माकर नागपूरकर

मूल्य १२५ रु.
सवलतीत ७५ रु.




### वृद्धत्व : देशोदेशी
पी.के. मुत्तगी
पद्माकर नागपूरकर

मूल्य ५० रु.
सवलतीत ३० रु.

'रुची' हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी 'ग्रंथाली'करता जयमल्हार प्रिंटिंग प्रेस, २१७, आशीष इंडस्ट्रियल इस्टेट, दादर (प) येथे छापून ग्रंथाली, द्वारा इंडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्याशाळा, दादर (प), मुंबई ४०००२८ येथे प्रकाशित केले.




ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# रुची

**सप्टेंबर २०१०**
**वर्ष ३० वे, अंक नववा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
या अंकाचे संपादन : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **रंजन जोशी**

**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**



पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला, टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर, ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
☎ २३८९ २४ ४५ ● फॅक्स : २३८७ ५४ ८१

ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, दादर(प), मुंबई ४०० ०२८ ☎ २४४७ ४८ ४३
Email - granthali01@gmail.com



**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**


स.न.

आपलं तेज मागे ठेवून सुर्वे नारायण अस्ताला गेला. 'मार्तंड जे तापहीन' असं ते तेज आहे. त्यांच्या वारसदारांनी सत्यकथेची होळी करून क्षोभ प्रकट केल्याचं आपणांस माहीत आहे. मात्र, सारस्वतांनो, सावधान! अशी हाळी देत हा नारायण प्रकटला आणि कोशात गुरफटलेल्यांना खडबडून जागं करता झाला. कामगार लढ्यात राहून अविवेकी आक्रमकता कधी जोपासली नाहीच; पण मार्क्सलाही गटे आवडत होता असं सांगत सांस्कृतिक धागाही जपला. गिरणगाव ओस पडलं, गिरण्यांच्या जागी मॉल होऊ लागले, अनेक देशोधडीला लागले; या बदलल्या मुंबईविषयी मोजक्या शब्दांत ते म्हणत, ''आज मुंबई आर्थिक झालीय. आधुनिकता आणि प्रगती याला माझा विरोध नाही, पण आपण कुणाचं बोट धरून चालतोय याचं भान हवं. आपलं स्वत्व ध्यानात हवं.''

त्यांच्या निवडक कवितांचा 'सनद' हा संग्रह ग्रंथालीनं प्रसिद्ध केला. त्यांचं निधन होण्याच्या दोन दिवस आधीच 'सनद'ची नवी आवृत्ती छपाईस पाठवली होती. त्याची प्रत त्यांना द्यावी असं ठरवलं होतं, पण आता त्याबद्दलची केवळ रुखरुख मनात राहिली आहे.

असंच आणखी एक संवेदनशील व्यक्तिमत्त्व आहे चित्रकार–कवी षांताराम पवार. पर्यावरणाचा होत चाललेला ऱ्हास पाहून ते अस्वस्थ होतात. त्यावर कविता करतात, जे एक आवाहन असतं. कलाकारांनीही सामाजिक भान कृतीतून व्यक्त करावं असं ते आवाहन. त्याला आज ख्यातकीर्त असलेले त्यांचे शिष्यगण मन:पूर्वक प्रतिसाद देतात आणि 'ऋतुसंहार' या प्रदर्शनाद्वारे आपापल्या कलाकृती मांडून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देतात. रंजन जोशी या अभिजात कलावंतानं त्याचा वृत्तांत लिहिलाय.

एनएसएसच्या मुलांच्या श्रमशक्तीचा उपयोग शेतीसाठी केल्यास त्यातून चळवळीसारखं काम कसं उभ राहू शकतं हे अभिजित हेगशेट्ये सप्रमाण सांगत आहेत.

अनुभवातून मूल्यशिक्षण सांगणारा 'जनसंवाद' आणि 'अवतीभवती'ला चांगला प्रतिसाद मिळतोय. 'ग्रंथाली' आणि 'रुची'नं त्याला नेहमीच महत्त्व दिलंय.

पुढील अंक ऑक्टोबर–नोव्हेंबर असा दिवाळी विशेषांक म्हणून प्रसिद्ध होईल. त्याची तयारी सुरू आहे. मासिक अंक डिसेंबरचा असेल.

**संपादक**

# क्रांतिकारक प्रगतिशील संवेदनेचा सनदशीर जाहीरनामा : नारायण सुर्वे

**डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी**

प्रश्न केवळ 'नारायण सुर्वे ह्यांचे मराठी कवितेत स्थान फार मोठे' असण्यापुरता मर्यादित नाही अथवा 'मर्ढेकर अथवा मर्ढेकरोत्तर कवितेचे सर्व पायंडे आणि अभिव्यक्तीच्या लकबी नाकारून त्यांची कविता उभी राहते की नाही' एवढ्यापुरता देखील मर्यादित नाही.

सुर्वे ह्यांच्या कवी असण्यापुरता देखील प्रश्न मर्यादित नाही. सुर्वेंची अभिव्यक्ती शब्द-माध्यमातून येऊ शकली नसती तर तिने काय रूप धारण केले असते असा मुळात प्रश्न उपस्थित करून बघितले पाहिजे. ज्या विद्यापीठाला सुर्वे 'माझे विद्यापीठ' म्हणतात व ज्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा ते 'जाहीरनामा' लिहितात, ज्याचे ब्रह्मच स्वत:धीन आहे अशा ज्या जीवनाची अभिव्यक्ती ते शब्दांची तळपती तलवार घेऊन 'गुन्हा' घडणार असेल तरी छातीठोकपणे करतात त्या 'गुन्हेगार' ठरणाऱ्या जीवनाला जर सुर्वे नावाचा शब्द फुटला नसता तर?

प्रत्यक्षात तळपती तलवारच हाती येण्याची शक्यता ठासून भरलेल्या क्रांतिकारतेला, ती प्रत्यक्षात हाती न घेताही तिला प्रागतिक सनदशीर रूप आणि देह, त्यातला अंगार, कणव, कारुण्य, विद्रोह यांची धार बोथट न होऊ देताही, संयतपणे धारण करता येणे कसे शक्य आहे हे सुर्व्यांच्या अभिव्यक्तीने दाखवून दिले. ही केवळ मराठीलाच नव्हे तर अखिल भारतीय आणि वैश्विक साहित्यालाही सुर्व्यांच्या निमित्ताने लाभलेली एक अभूतपूर्व व संस्मरणीय देणगी आहे. तिचे मोल आणि मूल्य केवळ कवितेपुरते मर्यादित नसून अभिव्यक्तीच्या या विद्यापीठाने जगातल्या तमाम विद्रोही, संतप्त, निषेधात्मक, व्यवस्थापरिवर्तक, परिवर्तनवादी, सामाजिक बांधीलकीने अभिव्यक्त होऊ होऊ बघणाऱ्या एकूणच जीवनाला दाखवलेली अभिव्यक्तीची वेगळी संयत प्रगतिशील अशी समांतर वाट आहे.

मराठी भाषेतून अशा रीतीने अभिव्यक्त होण्याची व अशी वाट शोधण्याची गरज निर्माण व्हायला व तिने आपला हा युगबोध अभिव्यक्त करायला हा 'नारायण' उगवण्याची प्रदीर्घ काळ प्रतीक्षा करावी लागली आहे.

ह्या सुर्वे-सूर्योदयापूर्वी मराठीत ह्या कवितेची मानवतावादी क्रांतिकारक पहाट केशवसुतांपासून अनंत काणेकर, कवी अनिल, कुसुमाग्रज, विंदा करंदीकर ह्यांच्या रूपाने होत आलीच होती. सुर्वेंची कविता हा त्या कवितेचा एका अर्थाने संपूर्ण विकास ठरावा.

मराठीतील सूर्यकुलाची, अग्निकुलाची, सूर्यफुलाची कविता अतिप्रखर वास्तवासहित स्वयंपूर्ण आणि अतिविकसित होऊन दलित कवितेचा देह धारण करती झाली. त्या साऱ्याची भूमी या सूर्यकुलाच्या पहाटेच्या आणि नंतरच्या पूर्ण-रुपेण उगवलेल्या ह्या नारायणाच्या अभिव्यक्तीने, शब्दकळेने, जीवनजाणिवेने आणि मूल्यबोधाने सिद्ध करत आणलेली आहे.

नारायण सुर्वे हे दलित कवी आहेत की नाहीत यावर रणकंदन माजवण्यापेक्षा दलित कवितेसह नारायण सुर्वे हे मुळात एकाच प्रगतिशील समांतर अभिव्यक्ती कुळाचे नातेवाईक आहेत की नाहीत ते ठरवणे तेव्हाही महत्त्वाचे होते, आजही आहे.

त्या अर्थाने ती अपारंपारिक अभिव्यक्ती तर आहेच, मात्र सुर्व्यांच्या जीवनशयाला लाभलेली तात्त्विक, सैद्धांतिक व वैचारिक बैठक जशीच्या तशी पुढे चालवणारी सुर्व्यांच्या प्रखर बांधील जाणिवेची शैलीदार कविता सुर्व्यांच्या नंतरही मराठीत उपलब्ध नाही.

सुर्वे युगाचा सूर्य हा सुर्व्यांच्याच कवितेपुरता मराठीत प्रखर तेजाने तळपला आणि त्या कवितेच्या रूपाने त्याचे ते तळपणे कायमच उरणार आहे.

दलित संवेदनेच्या कवितेच्या मूलाधाराचे सर्व स्रोत उपलब्ध असलेली, मात्र रूढार्थाने मराठी दलित कवितेच्या असणाऱ्या मर्यादा उल्लंघून जाणारी सुर्व्यांची अभिव्यक्ती ही जागतिक पातळीवरील प्रागतिक वाङ्मयाशी, पर्यायाने जागतिक पातळीवरील पिचलेपणा, वेदना, विद्रोह, शोषण व त्याची सांस्कृतिक अभिव्यक्ती करणारा समांतर कलाप्रवाह याच्याशी नाते सांगणारी सुर्व्यांची जीवनजाणीव ही मराठीतील एक अपवादात्मक गोष्ट आहे.

हा कवी फक्त शब्दाळू नाही, मायाळू देखील आहे. केवळ मायाळूच नव्हे तर तो प्रत्यक्ष सनदशीर चळवळी, संघटना बांधणारा, त्या चालवणारा, त्याला बळ प्राप्त करून देणारा त्यातला प्रत्यक्ष सहभागी असा रस्त्यावरच्या लढाईतला प्रगतिशील नागरिकही आहे. लेखक, कवी, कलावंत आणि कार्यकर्ता ह्यांच्यातले नाते एकमेकांवर कुरघोडी न करता एकाच वेळी कसे जपता येऊ शकते आणि सामाजिक बांधीलकी की अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य अशा फसव्या व पोकळ वादांच्या शाब्दिक लढाया उभ्या करण्यापेक्षा एकाच वेळी दोन्हींचा सांभाळ विवेकपूर्ण मार्गाने कसा करता येतो याचे 'रोल मॉडेल' मराठीत शाहीर अमर शेख, अण्णाभाऊ साठे, अनिल बर्वे ह्यांच्या बरोबरच किंबहुना काकणभर अधिकच नारायण सुर्वेंच्या रूपाने मराठीला लाभलेले होते.


एकाच वेळी गांधी, नेहरू, लोहिया, मार्क्स ह्यांच्या जीवनविषयक सैद्धांतिक,

तात्त्विक विश्लेषण-विवेचनाच्या पायावर उभे असणारे आणि त्याचवेळी स्थानिक लोकवाङ्मय, लोककला आणि लोकजीवनाचा शैलीसंस्कार जपणारे नारायण सुर्वे हे एक लोकशाही समाजवादी असे सुंदर कलात्मक शिल्प आहे.

सुर्व्यांच्या अभिव्यक्तीचे प्रयोजन प्रत्यक्ष जीवनच सुंदर करण्याचे आहे. त्यासाठी अव्याहत चालवणाऱ्या सामाजिक प्रक्रियेचे, संघर्षाचे कला, साहित्य हे सुर्व्यांसाठी एक माध्यम तेवढे आहे.

सुर्व्यांची प्रतीतीविश्रांती ही साहित्य निर्मिती पुरती मर्यादित नसून साहित्योत्तर उत्तरकर्तव्योन्मुखतेत सामावलेली आहे, जी भारतीय साहित्यशास्त्रीय परंपरेच्या विरोधात जाणारी आहे. त्या अर्थाने मर्ढेकर आणि सुर्वे हे एकाच सौंदर्यशास्त्राच्या परिघातले कलावंत ठरतात. मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र हे भारतीय साहित्यशास्त्र ज्या बदलत्या जीवनानुभवाची व जीवनाशयाची कलात्मक सोय लावू शकत नसल्याने ते बाजूला सारण्यासाठीच निर्माण झाले त्याची प्रत्यक्ष अभिव्यक्तीच्या पातळीवर ध्वजा सुर्व्यांच्या लेखनानेच फडकवली गेली.

**डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी**
१०५, संकल्प सहनिवास,
४०, खरे टाऊन, धरमपेठ,
नागपूर - ४४००१०.
मोबाइल - ९९६०४ ९३६२२.




**असाही एक महाराष्ट्र**
**संदेश भंडारे**
मूल्य ३५० रुपये, सवलतीत २१० रुपये

# असाही महाराष्ट्र

'नावात काय आहे' असे शेक्सपियर खुशाल म्हणो, पण प्रस्तुत चित्रमयजगताच्या नावातील 'असा' हा शब्द फार अर्थघन आहे. 'असा' म्हणजे ग्रामीण जीवन दाखवणारा आरसा. 'तसा' म्हणजे पंचतारांकित हॉटेल्स, गगनचुंबी इमारती किंवा वर्तमानपत्रे व दूरदर्शनवर दिसणारा महाराष्ट्र. चित्रकाराचा मानस 'असा' या एका शब्दाने व्यक्त होतो.

अनेक प्रसंग इथे जिवंत स्वरूपात पुढे येतात. पांढरेशुभ्र गुबगुबीत करडू (पृष्ठ ६), लेकराला आभाळाच्या छताखाली वाकळीवर निजवून धनाढ्यांच्या महालासाठी विटा घडवणारी आई (५०), पूर्वीच्या स्वयंपाक- घरात हजर असणाऱ्या दगडी वस्तूंच्या पसाऱ्यात जात्याला टाकी लावणारा कारागीर (९७) अशी चित्रे सांगावी? सगळेच उत्तम, डावे-उजवे नाही.

'दूध कुठून येते' या प्रश्नाला गाय-म्हैस न पाहिलेली मुंबईची मुले 'प्लॅस्टिक पिवशीतून' असे उत्तर देतात, असा एक किस्सा पूर्वी सांगत. पण लहानपणापासून मोठ्या गावात राहणाऱ्या प्रौढ व्यक्तींचे (अ)ज्ञान तत्समच आहे. चित्रांतील माणसे काय करत आहेत हे त्यांना एकदम कळणार नाही. श्री. डहाके यांनी सुरुवातीस पुष्कळ चित्रांची सूक्ष्म ओळख करून दिली आहे म्हणून ठीक. पुढच्या पिढीतल्या मुलांना, पाटा-वरवंटा, जाते-उखळ, खलबत्ता हे नुसते शब्दच राहतील, कारण या सर्व वस्तू व्यवहारातून गायब झाल्या आहेत. परंपरागत लग्नसमारंभात उखळ-जाते यांच्या पूजेचा विधी असे. उपयोगी पडणाऱ्या वस्तूंबद्दल कृतज्ञता दाखवणे हा उद्देश; मग त्या वस्तू निर्जिव का असेनात. आता हौशी गृहिणींना या विधीसाठी वस्तुसंशोधनाचा (बहुधा अयशस्वी) उद्योग करावा लागतो.

कलेच्या मापदंडाने चित्रे अप्रतिम आहेत. कलेचे रसग्रहण करायला एक वेगळी दृष्टी लागते हे निराळे. मात्र चित्रित कथांच्या मागचे वास्तव निराशाजनक आहे. एका सायकलवर कुटुंबाचा सगळा संसार मावतो, (३२). जीजस ख्राइस्टला आपला क्रॉस आपणच उचलून न्यावा लागावा, तद्वत कामकरी बाईला अनवाणी पायांनी आपला नांगर डोक्यावर वाहून न्यावा लागतो, ही चित्रे काय सांगतात? पृ.९ व १० वर नोंद आहे की माणसांच्या तोंडावर हास्य आहे. अशी पुष्कळ चित्रे आहेत. पण हे हास्य समाधानाचे नसून फोटोसाठी उसने आणलेले कृत्रिम हास्य आहे असे वाटत राहते. भंडारे यांच्या निवेदनातले, आकडेवारीसकट दिलेले खेड्यातील दु:स्थिती सांगणारे वर्णन चटका लावणारे आहे. योजना तयार करणारे व समित्या नेमत राहणारे सरकार आणि लोकशिक्षणाचे कर्तव्य विसरलेली प्रसारमाध्यमे यांचा वाटा ते अधोरेखित करतात. या उपेक्षितांचे अंतरंग भंडारे यांनी उलगडून दाखवले आहे.

हे चित्रकथन पाहत असताना खेड्यात बालपण घालवून आता शहरात स्थायिक झालेल्या एखाद्याला, आसपास नवलाख विजेचे दीप तळपत असतानाच माजघरातल्या मंद दिव्याची वात आठवेल, अपरिचित महाराष्ट्राची ही बोलकी चित्रे पाहताना कुणाला आश्चर्य वाटेल, कुणाला कणव येईल, क्वचित कुणाच्या मनात कार्य करण्याची प्रेरणा उत्पन्न होईल. 'जन नोहे अवघाचि जनार्दन' या भावनेने कुणी ही नारायण सेवा करायला उद्युक्त झाला तर भंडारे यांच्या चित्रकलेचे सार्थक होईल.

**आनंद कुलकर्णी**
प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य,
माहिती व जनसंपर्क आणि
मराठी भाषा विभाग मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२

# ‘ऋतुसंहार–कलाप्रदर्शन’

***सर ज.जी. कलादालन – ८ ऑगस्ट ते १२ ऑगस्ट***

## रंजन रघुवीर जोशी

या प्रदर्शनाने उद्‌घाटन षांताराम पवारांचे विद्यार्थी–मित्र, चाहते यांच्या उपस्थितीत अभिनव पद्धतीने झाले. सोमवारी संध्याकाळी सर ज.जी. उपयोजित कलामहाविद्यालयाच्या प्रवेशद्वारालगतच्या मोकळ्या जागेत सगळे जमले. राज शिंगे यांनी आणलेल्या भजनीमंडळाने ऋतुसंहार कविता टाळमृदंगाच्या तालावर भावपूर्णतेने गायली. त्यानंतर पुरुषोत्तम बेर्डे आणि दीपक वेलणकर यांनी ‘सावरकर विरुद्ध गांधी’ या बेर्डे यांच्याच नाटकातील पर्यावरणाचा संघर्ष मांडणारे प्रवेश साभिनय वाचून दाखवले. गंगाधरन मेनन यांनी सूत्रसंचालन केले आणि षांताराम पवारांनी कुंडीत रोपट्यासारखी लावलेली मेणबत्ती प्रज्वलित करून प्रदर्शनाचे उद्‌घाटन केले.

माझ्या चित्रकलेच्या प्रवासात शोध आणि बोधाच्या विविध छटा षांताराम पवारांनी दाखवल्या. माझ्यासारख्या अनेकांनी या ‘वादळाचा’ सुखद अनुभव घेतला आणि घेत आहेत. वयाच्या ७५च्या टप्प्यावरून पुढे जाताना अर्धांगिनीच्या (सौ. लीनावहिनी) वियोगाने खचून न जाता पुन्हा नवचैतन्याने सर्वांना जागृत ठेवण्याचा ते प्रयत्न करत आहेत. माणूस म्हणून जगताना निसर्गाच्या वास्तवाला सामोरे जाण्याचे सकारात्मक धाडस दाखवत आहेत.


नुकतेच जे.जे.मध्ये झालेले ‘ऋतुसंहार’ कलाप्रदर्शन वरील त्याचा थोडक्यात अनुभव आपणास देईल असे वाटते. त्यांच्याच अक्षरशैली संकल्पनेच्या रचनेतून मांडलेली ‘ऋतुसंहार’ कविता त्यांनी रचली व त्याची जागृत चळवळ व्हावी ह्या ध्येयाने जवळजवळ चाळीस विद्यार्थीमित्रांना फोन व प्रत्यक्ष भेटीद्वारे गेले तीन महिने या कवितेचा सतत पाठपुरावा करत राहिले. त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद देत पंचवीस विद्यार्थी मित्रांनी त्यांना आपल्या कलेद्वारे चकित करणारी भेट दिली. ही भेट म्हणजे ‘ऋतुसंहार’ कवितेच्या विविध छटा प्रत्येकाने आपापल्या दृक्‌संवेदनेनुसार निवडल्या आणि आपल्या कामातून हा नवा अर्थ घेत, भित्तिचित्र शिल्पकला, मांडणी शिल्पकला, अक्षररचना, संकल्पकला अशातून ‘ऋतुसंहार’ प्रदर्शन साकार झाले. निव्वळ दोन महिन्यांच्या कालावधीत कलाकृती तयार करणाऱ्या पंचवीस जणांची यादी तपासली तर प्रा. षांताराम पवारांचा गेल्या पाच दशकांच्या ह्या क्षेत्रातील प्रवासाच्या फलश्रुतीची झलक मिळते. पवारसरांचा वावर सर ज.जी. उपयोजित कला संस्था व कलाशाळेच्या आवारात १९५६ पासून १९७६ पर्यंत विद्यार्थी ते प्राध्यापक अशा विविध टप्प्यांवरून राहिला. सन १९६०पासून या चैतन्यशील कलाशिक्षकाच्या भूमिकेमुळे अनेक विद्यार्थी व मित्र जमले. ‘आर्टजत्रा’ ते ‘या मंडळी सादर करुया’सारखे चित्रनाट्य कला प्रयोग करून सर ज.जी.च्या मूळ स्वप्नांना जागृत ठेवत राहिले. म्हणूनच कलाकार पंचविशीची यादी त्या क्रमानुसार मुद्दाम मांडत आहे आणि त्यांच्या कलाकृतींची ओळखही.

> **वृ**क्षगणांचे कणे मोडले
> बघ मातीचे दहन जाहले
> हवापाणीही विषार बनले
> जंगलवासी मूठभर उरले
>
> **नि**सर्गहानी अशी अनावर
> चराचराला शाप भयंकर
> मानवा! थांबव ऋतुसंहार
> स्मरोनी ब्रह्माचे उपकार
>
> **शा**मल धरती फुलफळू दे
> हिरवेपिवळे उभे डोलू दे
> अूनपावसा रंग खेळू दे
> जिवाशिवाला हसूनाचू दे
>
> **मा**नवा! थांबव ऋतुसंहार
> स्मरोनी ब्रह्माचे उपकार.
>
> इति षांताराम

**अविनाश गोडबोले** १९६५ मध्ये विद्यार्थी होते. आज भारतीय जाहिरात चित्रकलेच्या व्यवसायात अग्रगण्य नाव आहे. ते उत्तम चित्रकार व सृजनशील संकल्पनाकार आहेत. ‘ऋतुसंहारातील’ निसर्गातील वृक्षांचा होणारा नाश आणि पानाचे काँक्रिट ब्लॉक्समध्ये होणारे रूपांतर त्यांनी सूचकपणे दाखवले आहे.

**अरुण काळे** १९६६च्या काळात विद्यार्थी होते. ते भारतीय जाहिरात कलेतील यशस्वी कलादिग्दर्शक आहेत. आपल्या कॅलेंडर शैलीतील चित्रातून प्रत्यक्ष ढगावर मानवी कुऱ्हाडीने घातलेला घाव व त्यातून रक्ताचा प्रचंड थेंब खाली असलेल्या सुंदर कमळावर पडून ते रक्तरंजित झाल्याचे दाखवले आहे. अतिवास्तववादी चित्रप्रतिमेचे हे एक सुंदर चित्र आहे.

**सौ. रतन गोडबोले** १९६६/६७ च्या काळातील विद्यार्थिनी व अविनाश गोडबोले यांची पत्नी. उपयोजित चित्रकलेतून कलात्मक वस्तूनिर्मिती व्यवसायातील मान्यवर व्यक्ती. मांडणी शिल्पकलेतून पक्ष्यांची किलबिल वर्तुळाकृती आकारात विविध पक्षीसमूहांना टांगून आजच्या




**नलेश पाटील**


परिस्थितीचे चित्र प्रतीकात्मक मांडणीने व्यक्त केले आहे.

**दिलीप शिवलकर** १९७० च्या काळात विद्यार्थी होते. मुंबईच्या जाहिरात कलाजगात यशस्वी छायाचित्रकार व कलादिग्दर्शक. त्यांनी काँक्रिटीकरणाचे परिणाम छायाचित्र व संगणकीय चित्रतंत्राच्या मिलाफातून समर्थपणे व्यक्त केले आहेत. वाळूच्या वाळवंटात रुतलेला राजाबाई टॉवर ही अशीच एक प्रतिमा.

**दीपक घारे** १९७०च्या काळात विद्यार्थी होते. आज मराठी साहित्य वर्तुळात समीक्षक व लेखक म्हणून परिचित आहेत. त्यांनी पवारसरांची प्रत्यक्ष कविताच भित्तिचित्राची मांडणी करण्याकरता घेतली असून, सूक्ष्म निरीक्षणाने तिचे अवलोकन करत कवितेच्या आजुबाजूसच आजच्या निसर्गऱ्हासाच्या कारणांची मांडणी केली आहे. नकारात्मकतेतून सकारात्मकतेचे प्रतीकात्मक चित्र आणि अक्षररचनेच्या दृश्य घटकीय रूपांतराचा एक प्रयोग म्हणून त्याकडे पाहिले पाहिजे.

**रंजन रघुवीर जोशी** १९७२ च्या काळात विद्यार्थी होते. एक कलाशिक्षक, प्रकाशनकला संकल्पक व दृक्कला वैश्विकतेचे अभ्यासक म्हणून गेली तीन दशके परिचित आहेत. त्यांनी उतरत्या क्रमाने मानवी अधोगतीची झालेली स्थिती 'मानवा थांबव ऋतुसंहार' हा भाव व्यक्त करण्यासाठी योजली आहे. त्यांचे १९७४ मधील 'अॅटम फॉर पीस' हे राज्यपुरस्कार प्राप्त भित्तिचित्र, त्यानंतर घर्षणजन्य अग्नीचा मानवाला लागलेल्या शोधांचे विकृत रूप, त्यानंतर मानवाचा अंतराळातील दुसऱ्या वस्तीचा शोध घेणारे चित्र व शेवटी झाडाचे उलटे झालेले पान–जे प्रत्यक्ष बोलू शकत नाही–ते ओरडून सांगते की मला खोकता येत नाही. म्हणजे तुम्हाला ह्या विविध मानवी प्रदूषणाचे भान देणारे अर्कचित्र.


**सौ. अंजली काळे** १९७३च्या काळात विद्यार्थिनी होत्या. त्या अरुण काळे यांच्या पत्नी आहेत. यशस्वी उपयोजित चित्रकार व काष्ठशिल्प माध्यमाकडे वळून अनेक



**सौ. विद्या जोशी**



**सौ. राणी पाटील**



**अविनाश गोडबोले**


प्रकारच्या शैलीत त्या काम करतात. निसर्गाने भरलेले गाव हळुहळू विस्कटत चाललेले त्यांनी काड्यापेटीच्या काड्यांच्या उत्कीर्ण मांडणशैलीतून आणि गडद हिरव्या रंग–संगतीने दाखवले आहे. तो हिरवा रंग कमी होताना दिसतो. थोडक्यात वाळवंट!

**विकास गायतोंडे** १९७३च्या काळात विद्यार्थी होते. आज भारतीय जाहिरातकला विश्वात उच्च स्थानावर आहेत. त्यांनी पुनर्वापर प्रक्रियेतील कागदातून निर्माण केलेली अनेक लहान आकारांची खोकी व त्यावर झाडाचे 'शामल धरती'चे भाव प्रतीकात्मकपणे रेखांकित करणारे चित्र साकारले आहे. 'सिल्क स्क्रीन' पद्धतीने विविध रंगांत ते छापलेले आहे. ह्या सर्व खोक्यांची हवी तशी मांडणी कुणीही पुन्हा पुन्हा साकारू शकतो. पर्यावरणाला पोषक अशा फेरवापर तत्त्वाचे; कलात्मक पातळीवरील घटकांच्या पुनर्मांडणीच्या तत्त्वातून साकारलेले हे मांडणीशिल्प आहे.

**नलेश पाटील** १९७५ मध्ये विद्यार्थी होते. पवारसरांसारखेच उत्तम संकल्पनाकार व कवी म्हणून परिचित आहेत. जाहिरात व्यवसायात गंगाधरन मेनन या सृजनशील लेखक कलाकाराच्या जोडीने दोन दशके भारतीय जाहिरात कलेत आपला ठसा त्यांनी उमटवला. त्यांनी संत तुकारामांच्या वृक्षवल्लीच्या सुप्रसिद्ध ओळीवर चित्रभाष्य

करणारे रेखाटन केले आहे तसेच संपूर्ण भित्तिचित्रांच्या खालच्या जागेत झाडाच्या एकाच पानाने आजच्या परिस्थितीवर चित्रभाष्य केले आहे!


**रघुवीर कुलकर्णी** १९७५च्या काळात विद्यार्थी होते. मराठी चित्रपट/नाट्य/अभिनय क्षेत्रातले एक जाणकार लेखक आहेत. जाहिरात व्यवसायात रघुवीर कुल नावाने अधिक परिचित आहेत. लाकडी चौकटीला गुंफलेली झाडांची सुकलेली फांदी व त्या फांदीला अडकलेले पक्ष्याने विणलेले डौलदार घरटे व त्या घरट्यात पक्ष्याच्या पिलाऐवजी पृथ्वीचा चकचकीत प्लॅस्टिकचा गोळा असे मांडणीशिल्प त्यांनी साकारले आहे.



**सौ. माणिक शिंगे**

**पुरुषोत्तम बेर्डे** १९७५च्या काळात विद्यार्थी होते. मराठी चित्रपट/नाट्य/संगीत/लेखक व निर्माता असून, ते 'पुरू बेर्डे' नावाने परिचित आहेत. सतत नव्याच्या ध्यासात सृजनशीलता जपणारे बेर्डे यांनी छायाचित्रांच्या वास्तवातून आजच्या ऋतुसंहारांची स्थिती दाखवणारी जाहिरात मोहीम केली आहे. पृथ्वीचा ऱ्हास कृपया थांबवा असा कळकळीचा संदेश त्यांनी मांडला आहे.

**अरुण आंबेरकर** १९७५च्या काळात विद्यार्थी होते. जाहिरातकला व्यवसायात स्थान निर्माण करत पारंपरिक बाहुल्या-निर्मितीच्या सृजनात्मक नव्या व्यवसायाची



**सौ. रतन गोडबोले**

सुरुवात त्यांनी केली. त्यांनी कापडविरहित छत्री, फाटलेला गंजीफ्रॉक इत्यादींद्वारे पवारांच्या कवितेचा मथितार्थ व्यक्त केला आहे.

**अशोक साळगावकर** १९७५च्या काळात विद्यार्थी होते. जाहिरातकलेत स्थिरावले असतानाच 'टेराकोट्टा' ह्या पारंपरिक मातीकाम शिल्प रचनेत उत्कीर्ण शिल्प-कलाकार म्हणून ते परिचित आहेत. त्यांनी ह्याच माध्यमातून, पारंपरिक चित्रशैलीतून ऋतुसंहाराचा मथितार्थ व्यक्त केला आहे.

**गंगाधरन मेनन** १९७६ पासून पवारसरांचा परिचय झाला आणि पवारसरांना ते गुरू मानू लागले. भारतीय जाहिरातकला व्यवसायात कॉपीरायटर म्हणून नलेश पाटील सोबत दोन दशके यशस्वी काम केले. जाहिरात, चित्रपटविषयक लेखन त्यांनी केलेले आहे. त्यांची मांडणीशिल्पाची रचना मनाला जागे करणारी आहे. निर्माता ब्रह्मा, रक्षणकर्ता विष्णू आणि संहारकर्ता म्हणून चक्क मोठा आरसा लावलेला आहे. त्यात आपले प्रतिबिंब चटकन दिसते व स्वत:बद्दल लाज वाटल्यासारखी जाणीव बघणाऱ्याच्या मनात निर्माण होते. धक्कातंत्र पद्धतीची ही कलाकृती आहे. त्याचप्रमाणे दुसऱ्या कलाकृतीत प्रत्यक्ष कुऱ्हाड छताला टांगून त्या खाली आपण काही सेकंद उभे राहावे असे सुचवले आहे. त्यावेळेस आपणास कसे वाटते? डोक्यावर कुऱ्हाड असतानाचा थरार आपल्याला जागे करतो.

**सौ. विद्या जोशी** १९७५ मध्ये विद्यार्थिनी होत्या. सर ज.जी. कलासंस्थेतच गेली तीन दशके उत्कृष्ट उपयोजित चित्रकला शिक्षक म्हणून त्या परिचित आहेत. रंजन जोशी यांच्या त्या पत्नी आहेत. सतत सृजनशील कलाशैक्षणिक प्रयोग त्या करत असतात. काळ्या शाईने फिकट पांढऱ्या कागदावर सुकलेल्या झाडाचे वैशिष्ट्यपूर्ण रेखाटन त्यांनी केले आहे. चित्राच्या मध्यभागी असलेले सफरचंदाचे फळ विषण्ण वास्तवाचे भान देते व झाडाच्या बुंध्याशी निस्तेज



**सौ. सेजल क्षीरसागर**

पहुडलेली स्त्री यातून ऋतुसंहाराचा प्रतीकात्मक आशय व्यक्त होतो.

**सौ. राणी पाटील** १९७६च्या काळात विद्यार्थिनी होत्या. यशस्वी अभिनेत्री, नाट्य/चित्रपट कलाव्यवसायात सृजनशील पोशाख रचनाकार म्हणून प्रसिद्ध. नलेश पाटील यांच्या त्या पत्नी आहेत. पाण्याचे मडके घेऊन त्यांनी प्रत्यक्ष नळाची जोडणी मडक्याच्या डोक्याजवळ केली आहे व त्यावर खडूने 'मडके भरू दे' असा हाकेचा स्वर अक्षरांकित केला आहे. नळाची जोडणी डोक्याजवळ असल्याने त्यातून प्रतीकात्मकतेने न भरणाऱ्या पाण्याचा निषेधात्मक भावच व्यक्त झालेला आहे.

**राज शिंगे** १९७६च्या काळात विद्यार्थी होते. चित्रकला, शिल्पकला, मांडणी शिल्पकला, कलाशिक्षक आणि प्रयोगशील मराठी कवी अशा विविध भूमिकांतून ते परिचित आहेत. मुंग्यांची एकत्रित काम करण्याची पद्धती व प्रतिकूल परिस्थितीवर सतत मात करण्याची वृत्ती हे मांडणीशिल्पाद्वारे त्यांनी दाखवले आहे. मुंग्यांची लाखाच्या माध्यमातून शिल्पनिर्मिती करून एका रेषेतून सरकणारे हे मांडणीशिल्प त्यांनी साकारले. चलतचित्रपटाप्रमाणे सचेतन गुण प्रकट करणारे हे शिल्प थेंबे थेंबे तळे साचेचा जणू संदेश देत राहते.

**सौ. माणिक शिंगे** – १९७७ मध्ये सर जे.जे.च्या विद्यार्थिनी होत्या. पवारसरांनी त्यांना शिकवलेले नाही. परंतु सरांच्या विविध कामांतून त्यांनी चित्रप्रेरणा घेतली. त्या राज शिंगे यांच्या पत्नी आहेत. भारतीय समकालीन तरुण चित्रकर्ती म्हणून त्यांचा नावलौकिक आहे. उत्कृष्ट कलाशिक्षक म्हणून त्या परिचित आहेत. त्यांच्या चित्रात भारतीय शैलीच्या प्रभावातील परंतु स्वतंत्रपणे विकसित झालेल्या चित्रशैलीचे दर्शन घडते. मानवी आकृतिबंध, हिरवेपिवळे रंगसंगतीचे पोत व 'जिवाशिवाला हसू–नाचू दे' या वर्णनाला साजेसे असे हे चित्र आहे. विशुद्ध चित्रकलेतून सादर केलेला ऋतुसंहार संकल्पनेचा हा उत्तम नमुना आहे.

**महादेव शेटचे** १९७६मध्ये पवारसरांचे विद्यार्थी होते. ते जाहिरात कला व्यवसायात संकल्पनाकार म्हणून कार्यरत आहेत. विशुद्ध चित्रकलेच्या आधारे ॲक्रलिक रंग माध्यमातून आणि मोटारीच्या क्रॉम्प्रेसरसारख्या प्रतिकात्मक मांडणीतून मातकट प्रदूषित रंगसंगतीद्वारे हवापाणीही विषार बनले हा आशय त्यांनी प्रभावीपणे मांडला आहे.

**सुनील महाडिक** १९८१ मध्ये विद्यार्थी होते. पवारसरांचे प्रत्यक्ष शिष्यत्व नाही, परंतु ज्येष्ठ विद्यार्थ्यांद्वारा पवारसरांच्या कामाचा महाडिक यांच्यावर प्रभाव पडला. अतिशय लहान वयात भारतीय जाहिरात कलाव्यवसायातील यशस्वी कलादिग्दर्शक म्हणून त्यांनी सुरुवात केली व आज विविध चित्रसंकल्पना, जाहिरातकला मोहिमा याद्वारे उद्योजक व सृजनशील व्यक्ती म्हणून ते परिचित आहेत. त्यांच्या छायाचित्रकलेतून विशुद्ध चित्रकलेचे आविष्करण झालेले दिसते. त्यांनी धातूच्या पत्र्यांमध्ये सकारात्मक शिल्प केलेले आहे. माणसांचे रूपांतर पर्णभाराने फुललेल्या वृक्षात त्यांनी केले आहे. हे शिल्प पूर्ण शुभ्र रंगात असून मानवाकृतीचे झाड व त्याची हिरवी सावली अर्थपूर्ण आहे. अतिशय कल्पकतेने केलेला छायाभेदाचा वापर पृष्ठभागावर विविध आकृतिबंध निर्माण करतो व विचारांना प्रवृत्त करतो.

**अच्युत पालव** १९८२ मध्ये विद्यार्थी होते. पवारसरांनी त्यांना प्रत्यक्ष शिकवलेले नाही. आज भारतीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर सुलेखनकार म्हणून ते सर्वांना परिचित आहेत. महाकाय झाडाच्या वृक्षतोडीनंतर उरलेल्या बुंध्यावरील सपाट पृष्ठभागावर केलेले सुलेखन म्हणजे वृक्षाचे मोडलेले कणे वाटतात. त्यावरील ओळी त्यांच्या नेहमीचा सुलेखन पद्धतीने केल्या असून, त्या वेगळी जाणीव करून देतात.

**संतोष क्षीरसागर** १९८५ मध्ये विद्यार्थी होते. पवारसरांच्या प्रत्यक्ष न शिकवलेल्या विद्यार्थ्यांपैकी एक, परंतु त्यांच्या चित्रकार कवीसंकल्पनेतील ते एक सहभागी कवी आहेत. 'ऋतुसंहार' ह्या कवितेच्या आशयाला पूरक असे आवाहन त्यांनी मोठ्या स्क्रोल जाहीरनाम्याच्या माध्यमातून केले आहे. एका पृथ्वीसदृश चेंडूला टांगून त्यांनी खाली बॅट, हॉकी स्टिक ठेवल्या आहेत. येणाऱ्या–जाणाऱ्यांनी त्या पृथ्वीसदृश चेंडूला इकडून तिकडे जोराने टोलवावे हा भाव त्यात आहे. थोडक्यात, मानवाने ह्या सुंदर पृथ्वीचा असा खेळांतील चेंडूच करून टाकला आहे तो कुठेतरी थांबवा हेच त्यांना या मांडणशिल्पातून सूचित करावयाचे आहे.

**सौ. सेजल क्षीरसागर** १९८६ मध्ये विद्यार्थिनी होत्या. पती संतोष क्षीरसागरांकडून षांताराम पवार व त्यांच्या कविता त्यांनी समजून घेतल्या. ह्या ठिकाणी आपल्या विशुद्ध सर्जनशील चित्रमांडणी शिल्पातून भित्तिचित्राद्वारे त्यांनी ecofriendly कागदनिर्मितीच्या आविष्कारातून अमूर्त कलाकृती प्रदर्शित केली आहे. गेली काही वर्षे आपल्या चित्रकृतीतून मुंबई चित्रकला जगतात त्यांनी स्वत:चे स्थान निर्माण केले आहे.

**मंगेश सुतार** पवारसरांच्या जाहिरात व्यवसायाच्या प्रवासात सुतारांची पवारसरांशी ओळख झाली. संगणकीय चित्रकलेतील कलाकौशल्य व त्यातील तंत्रज्ञानाने स्वतंत्र ठसा या व्यवसायात त्यांनी निर्माण केला. पवारसरांच्या कामाचा प्रभाव त्यांच्यापर्यंत पोचल्यावर त्यांनी पवारसरांचे नकळत शिष्यत्व पत्करले. ह्या प्रदर्शनाच्या मध्यवर्ती कल्पनेला पोषक मांडणीशिल्पाच्या आकारणीस त्यांनी सरांना प्रत्यक्ष मदत केली. आपल्या संगणकीय तंत्रज्ञानाच्या कलाकौशल्याने दोन कलाकृतीही मांडल्या. एका चित्रात दोन मानवी पावले आहेत. एक लाल रंगाचे तर दुसरे हिरव्या. दुसऱ्या चित्रात पृथ्वीरूपी बॉम्बच्या प्रतीकात्मक स्फोट होण्याच्या स्थितीतले चित्र मोठ्या आकाराच्या भित्तिचित्र माध्यमात मांडले आहेत.

**कु. अर्चना चाफेकर** २०१०ची सर जे.जे.ची उपयोजित कलेची पदवीधारक आहे. पवारसरांना तर तिने कधी प्रत्यक्ष पाहिलेही नव्हते. पण पवारसरांच्या 'कविथा' या प्रसिद्ध काव्यकथासंग्रहावर तिने अंतिम वर्षात प्रोजेक्ट तयार केला होता. त्याद्वारे परिचित झालेली त्यांची प्रतिमा जपत ती ह्या प्रदर्शनात सहभागी झाली. पवारसरांच्या प्रेरकशक्तीचा हाच खरा प्रभाव म्हणावा

लागेल. तिने तिच्या स्वतंत्र त्रिमितीतील कलाकृतीद्वारे हिरव्या प्लॅस्टिकच्या एका पृष्ठभागाचे फडफडणाऱ्या पानाच्या आकारांच्या मांडणीशिल्पांत रूपांतर केले आहे. ते अवकाशात टांगून त्याखाली लाकूड कापण्याची करवत मांडली आहे. 'वृक्षगणांचे कणे मोडले', थोडक्यात वृक्षतोड करू नका असे सांगण्याचा हा प्रयत्न. हे सचेतन मांडणीशिल्प प्रत्यक्ष प्रदर्शनात चैतन्य निर्माण करणारे ठरले.

या कलाकृतींबरोबरच पवारसरांनीही दोन मांडणीशिल्पे प्रदर्शनात मांडली होती.

पहिल्या मांडणीशिल्पातून तिरडीवर ठेवलेली सप्तरंगी लाकडाची मोळी तर दुसऱ्या शिल्पात जळून खाक झालेली, कोळसा झालेली रुग्णशय्येवरील पृथ्वी. ग्लोबल वॉर्मिंगमुळे हिमालयाचे बर्फ वितळत चालल्याच्या बातमीने त्यांना अस्वस्थ केले. लालबाग, परळसारख्या भागांत अतिवृष्टी-मुळे साचणारे पाणी, त्याचा घेतलेला प्रत्यक्ष अनुभव हे सर्व त्यांना स्वस्थ बसू देईना! त्यांच्यातील संवेदनाशील, सामाजिक बांधिलकी मानणारा कलावंत जागा झाला व प्रथम 'ऋतुसंहार' कविता जन्मली! ही कविता समविचारी लोकांनी प्रसिद्ध केली. त्यांच्या विद्यार्थीमित्रांशी ते या विषयावर पोटतिडकीने बोलत राहिले. ह्यातून त्यांच्यातील बंडखोर कार्यकर्ता कलावंत जागा झाला. चाळीस फोन करून आवाहन करते झाले व शेवटी वरील २५ जणांनी त्यांची तळमळ व कळकळ आपापल्या परीने, त्यांच्या उत्साहाला दाद देत, प्रत्यक्षात आणली. सर जमशेटजी जीजीभॉय व नानाशंकर शेट यांच्या १५० वर्षांच्या भारतीय चित्रकारांच्या अस्मितेला जागृत करणाऱ्या स्वप्नाला त्याच कला महाविद्यालयाच्या आवारात हे प्रदर्शन उभे करून पवारसरांनी न्याय दिला. चित्रकार स्वार्थी, एकलकोंडा असतो, या समाजाच्या कथित विचाराला षांताराम पवारांनी ह्या वयातदेखील त्याच जोमाने छेद देत उत्तर दिले. आपल्या समविचारी सहकाऱ्यांसह प्रत्येकाची नोंद घेत हा लेख लिहिण्याचे मुख्य कारण मी स्वत: याचा एक भाग बनून आत्मिक समाधान मिळवू शकलो. कृतज्ञता दोन प्रकारे व्यक्त झाली, प्रथम निसर्गाबद्दल व नंतर प्रत्यक्ष लढवय्या चित्रकार-कवी गुरूबद्दल.

**रंजन जोशी**
विकास पाम्स, १०२ ए,
डॉ. आंबेडकर रोड, ठाणे (पश्चिम)
भ्रमणध्वनी : ९९२०१२५११२

## सावधान! जनहो, सावधान!

*होमो सेपियन्स येत्या १०० वर्षांमध्ये नष्ट होण्याची भीती ऑस्ट्रेलियातील शास्त्रज्ञ प्रा. फ्रँक फेन्नर यांनी व्यक्त करून एक महिनासुद्धा उलटलेला नाही, तोच स्टिफन हॉकिंग यांनी अवकाशातील परग्रहांवर माणसानं वसाहती केल्या तरच माणूस समूळ नष्ट होण्यापासून वाचू शकेल, असे विधान केले आहे. फेन्नर हे नामवंत जीवशास्त्रज्ञ; तर हॉकिंग हे भौतिकशास्त्रज्ञ. मात्र दोन्ही शास्त्रज्ञांना वर्तमानाची गती, त्यामध्ये होत असलेल्या घडामोडी, गेल्या शतकातील प्रगतीच्या रेट्यामध्ये घडलेल्या उलथापालथी, अविरतपणाने होणारा लोकसंख्येचा स्फोट, तिच्या बेसुमार गरजा भागवण्यासाठी होणारा नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास, त्याचा पर्यावरणावर होणारा अपरिहार्य परिणाम आणि वातावरणात होत असलेले बदल या साऱ्यामध्ये भविष्यातील धोके स्पष्टपणानं दिसू लागले आहेत.*

*हे धोके याच शास्त्रज्ञांना जाणवत आहेत, असं नाही. म्हणजे केंब्रिज विद्यापीठातील प्रा. निकोलस बॉईल यांच्या म्हणण्यानुसार २०१४ साल हे कळीचं ठरणार आहे. त्या वर्षामध्ये भविष्यात आपली वाटचाल कशी होईल हे ठरून जाईल! एकविसावं शतक हे हिंसा आणि दारिद्र्य यांनी भरलेलं असेल की सुखाचं असेल ते त्याच वर्षात नक्की करणाऱ्या घटना घडतील, असं त्यांचं म्हणणं आहे. तर प्रा. जेम्स लव्हलॉक यांच्या म्हणण्यानुसार जागतिक पातळीवर हवामानात होणाऱ्या बदलांचा दुष्परिणाम इतका तीव्र असेल की संपूर्ण जगाची लोकसंख्या ५० कोटींवर येईल! (आजच्या गतीनं सन २०११च्या अखेरीस जगाची लोकसंख्या ६८० कोटी असेल, असा अंदाज युनायटेड नेशन्सनं व्यक्त केला आहे.) ऑप्टिमम पॉप्युलेशन ट्रस्टचे सायमन रॉस यांनीसुद्धा असंच भयचकित करणारं भाष्य केलं आहे. ते म्हणतात, आज संपूर्ण मानवजातीपुढे तीन मोठी आव्हानं आहेत; ती म्हणजे अखंडपणाने वाढणारी लोकसंख्या, जैविक बहुविधतेचा नाश आणि वातावरणात होणारे घातक बदल!*

*या सर्वच जाणत्यांनी संपूर्ण मानवजातीलाच इशारे दिले आहेत. त्याची दखल घेऊन आपल्या जीवनशैलीत कसे बदल करावयाचे हे ज्याचं त्यानं ठरवायचं आहे. अर्थात आता कितीही बदल केले तरी त्याचा फार उपयोग होणार नाही; कारण आपण आता अशा वळणावर येऊन पोचलो आहोत की तिथून परतीचे मार्ग संभवत नाहीत. दुसऱ्या भाषेत सांगायचे, तर काही वर्षांपूर्वी वातावरणातील बदलांचे जे चक्र फिरू लागले आहे, त्याला आता उलट्या दिशेनं वळवता येणार नाही. याचं कारण तसं करण्याची वेळ केव्हाच निघून गेली आहे.*

*स्टिफन हॉकिंग यांनी व्यक्त केलेली भीती ही बेबंदपणानं वाढणारी लोकसंख्या आणि नैसर्गिक संपत्तीच्या मर्यादित साठ्यांचा अमर्याद वापर याच्याशीच निगडित आहे. आपण तंत्रज्ञान विकसित केलं; पण त्या तंत्रज्ञानानंच आपल्याला पर्यावरणामध्ये चांगले-वाईट बदल करण्याचीही 'शक्ती' दिली. गेल्या १०० वर्षांत आपण प्रचंड प्रगती केली. तशीच आपण यापुढेही करत राहिलो, तर भविष्यात आपल्याला अवकाशस्थित परग्रहांचा आसरा घेण्याशिवाय पर्याय राहणार नाही, असं हॉकिंग यांचं म्हणणं आहे. हॉकिंग काय किंवा फेन्नर काय, लव्हलॉक काय किंवा बॉईल काय; सर्वच जण एका देशाचा, खंडाचा, वंशाचा, धर्माचा विचार करत नाहीत; तर अखिल मानवजातीचा विचार करत आहेत. मानवनिर्मित साऱ्या भिंती मोडण्याची वेळ आता आली आहे, असं ते सांगत आहेत. हा विचार सर्वत्र रूजणं आवश्यक आहे.*

**श्रीराम शिधये, महाराष्ट्र टाइम्स, १२ ऑगस्ट २०१०**

# मानवजातीतल्या प्रत्येकानं वाचावं असं 'नाझी नरसंहार'

## राजन खान


कुमार नवाथे यांस,

मराठी साहित्यातल्या माहितीपर किंवा ज्ञानपर पुस्तकांमध्ये अतिशय मोलाची भर घालणारं आपलं 'नाझी नरसंहार' हे पुस्तक वाचलं न् भयंकर हादरलो, थरथरलो, घाबरलो, कळवळलो आणि रडलोसुद्धा.

माणूस फार आधुनिक झाला, तांत्रिकदृष्ट्या फार विकसित झाला असं म्हटलं जातं. प्रत्यक्षात तो टक्क्यानं विकसित झालेला आहे असं काही भोवतीचं जग पाहता वाटत नाही. विशेषत: माणसानं माणसाशी बाळगलेल्या शत्रुत्वाच्या बाबतीत. आदिम काळापासून माणसाचा सर्वांत मोठा शत्रू माणूसच आहे. आपल्यापेक्षा दुसऱ्याला परकं मानणं, आपल्यापेक्षा दुसऱ्याला खालचं मानणं, स्वत:च्या इच्छेसाठी किंवा भल्यासाठी दुसऱ्याच्या नायनाटाची मनीषा बाळगणं आणि शक्य असेल तर ती अमलात आणणं, दुसऱ्याला सुखानं जगू न देणं हे माणसाचं जुनंच वैशिष्ट्य आहे न् ते आजही मौजूद आहे. या आपल्या विकृत गुणधर्मासाठी माणसानं कितीतरी प्रकारचे विकृत भेद माणसांच्या जातीतच करून ठेवलेत आणि माणसाचा विकास म्हणजे या भेदांचाच दांडगा विकास अशी आजची वाईट परिस्थिती आहे. आपापसांतल्या भेदांच्या असंख्य आणि अगणित मारामाऱ्या जगभर प्रत्येक स्तरावर चालू आहेत. या मारामाऱ्यांपैकी जगभर प्रचंड गाजलेल्या एका विकृत मारामारीचं निदर्शक आपलं पुस्तक आहे. स्पष्टच सांगायचं तर आपलं पुस्तक म्हणजे आपण माणसाच्या जातीला दाखवलेला तिचाच काळा आरसा आहे.

जगभर भेदप्रकाराचा शिरोमणी म्हणून अवाढव्य गाजलेला प्राणी म्हणजे हिटलर. (खरं तर, दुसऱ्या माणसांबद्दल कोणत्या ना कोणत्या प्रकारचा भेद बाळगणारा जगातला प्रत्येकच माणूस मला हिटलरच वाटतो. आपल्या आसपास डोळे मिटून पाहिलं तरी लक्षात येतं की, हे जग हिटलरचंच आहे. लिंग, जात, धर्म, पंथ, वंश, देश, प्रदेश, वर्ण, लायकी यांचे भेद पाळणारे मला सगळेच हिटलर वाटतात. या भेदांच्या टोळ्या करणारे, त्यासाठी रक्तपात, दंगली, युद्ध करणारे, बाँबस्फोट करणारे, सैन्य बाळगणारे, शस्त्र शोधणारे हे महाहिटलर). या हिटलरनं केलेल्या विदारक मानवी संहारावरचं माझ्या माहितीनुसार मराठीतलं हे एकमेव पुस्तक आहे. हिटलवर पुस्तकं खूप आली, पण त्यानं ज्यूंच्या वंशविच्छेदासाठी उभारलेल्या संहारछावण्या असा विषय घेऊन लिहिलं गेलेलं हे एकमेवच पुस्तक आहे आणि अशा माहितीपर पुस्तकांच्या बाबतीत मराठीची आजवरची परंपरा अशी आहे की, अशी पुस्तकं बहुधा त्यांचे लेखक आपल्या घरीच बसून लिहितात; निरनिराळी पुस्तकं जमवतात, त्यातल्या माहितीची उसनवारी करून संकलनं करतात आणि पुस्तकं जन्माला घालून घरबसल्या त्या विषयांचे तज्ज्ञ होतात. आपल्या पुस्तकाच्या बाबतीत मात्र तसं झालेलं नाही. आपण हे पुस्तक लिहिण्यासाठी प्रत्यक्ष जर्मनीतल्या या संहारछावण्यांचा प्रवास करून, माहिती साक्षात मिळवूनच ते लिहिलं आहे. प्रवास म्हटला, की प्रेक्षणीय, रमणीय ठिकाणांचा करून यायचा अशीही एक मराठीत परंपरा आहे. एक तर पुस्तक लिहिण्यासाठी या गुलछबू ठिकाणांना भेटी द्यायच्या अशीसुद्धा मराठी लेखकांना सवय आहे किंवा अशा ठिकाणांना भेटी देऊन आल्यावर लेखक व्हायचं अशीसुद्धा काही मराठी माणसांना सवय आहे. आपण मात्र अगदी ठरवून, प्रेक्षणीय, रमणीय असं काहीच नसलेल्या न् मन विदीर्ण करणाऱ्या संहार-छावण्यांना मुद्दाम भेटी दिल्या न् मगच त्या संहारछावण्यांच्या कहाण्या लिहिल्या. हेसुद्धा आपलं आणखी मोठेपण आहे.

माणसातल्या संहारक विकृतीचं दर्शन माणसालाच घडवणं हे मोठं काम आपलं




**नाझी नरसंहार –** *कुमार नवाथे*

कुमार नवाथे यांनी 'शिंडलर्स लिस्ट' सिनेमा पाहिला आणि ते पोलंडमधील आउत्शवित्झ येथील नाझी छळछावण्यांतील मृत्युकांडाच्या कहाण्यांनी हादरून गेले. त्यांनी त्या सर्व जागा पाहिल्या. त्यामुळे त्यांना वाटले, की नाझीच्या फासिस्टवृत्ती आणि कृती किती दाहक आहेत हे मराठी वाचकांपुढे मांडावे. त्यातून निर्माण झाले एकूण ११० पानांची संहिता आणि २६ पाने कृष्णधवल छायाचित्रकथा असलेले हे पुस्तक.

**मूल्य १५० रु. ९० सवलतीत रु.**

| नोंद |

# एका पत्रकाराची साठवण !

## अरविंद गोखले

एक काळ असा होता की, पुणे शहरात नाव घेण्याजोगी फक्त दोनच दैनिके होती. सकाळ आणि केसरी. तशी तरुण भारत आणि विशाल सह्याद्री ही दैनिकेही होती, पण ती दोन भिन्न राजकीय मतप्रवाहांना वाहिलेली होती. त्यामुळे सर्व तऱ्हेच्या राजकीय आणि सामाजिक आशयाच्या बातम्यांसाठी आणि वाचनानंदासाठी केसरी आणि सकाळ या यांच्यावरच वाचकांच्या जास्त उड्या पडायच्या. रस्त्यात बसणाऱ्या गाईम्हशींपासून सर्व काही 'सकाळ'मध्ये दिसायचे. पुण्याचे सर्वांसाठी असणारे दैनिक हे त्याचे स्वरूप होते. 'सकाळ'चा अग्रलेख तुम्ही वाचलात का, असे तेव्हाही कुणी विचारत नसे. केसरीचे तसे नव्हते. तो त्या काळात रंगहीन, चवहीन कधीच नव्हता. जे काही लिहायचे ते ठणठणीत, ही त्यावेळची केसरीची शिकवण होती. त्याचे श्रेय तेव्हाचे संपादक जयंतराव टिळक यांच्या नेतृत्वाला होते, तसे त्यांचे सर्व संपादकीय मंडळही तितकेच जबाबदार होते. त्या काळात जयंतरावांना साह्य करणाऱ्या संपादकीय मंडळामध्ये हरिभाऊ कुलकर्णी, का.ना. सोमण, वि.स.माडिवाले, वि.स. वाळिंबे, भा.द. खेर, चंद्रकांत घोरपडे, य.वि. नामजोशी, राजभाऊ कुलकर्णी अशी जबरदस्त ताकदीची माणसे होती. या सर्वांचे स्वतंत्र असे व्यक्तिमत्त्व होते. अगदी सर्वार्थाने जयंतरावांचे ते अष्टप्रधान होते. यापैकी राजाभाऊ कुलकर्णी मुंबईत असत. केसरीचे रूपांतर दैनिकात झाल्यानंतर काही वर्षांनी यापैकी एका व्यक्तीवर फार अन्याय झाला हे जयंतरावांनाही मान्य होते, पण त्या काळच्या परिस्थितीपुढे त्यांचा इलाज नसावा. ही व्यक्ती म्हणजे वि.स. वाळिंबे. एके दिवशी त्यांना केसरीमधून तडकाफडकी जावे लागले. तो सर्व काळ आम्ही पाहिलेला आहे. मी स्वत: तेव्हा आणि पुढेही बराच काळ केसरीत असल्याने त्या उलघालीचा मी साक्षीदार होतो.

या सर्व आठवणींना आता उजाळा द्यायचे कारण म्हणजे वि.स. वाळिंबे यांच्या पत्नी विनिता यांनी लिहिलेले 'साठवणीतल्या आठवणी' हे माझ्या वाचनात आलेले नवेकोरे पुस्तक. त्यांनीही तो इतिहास लिहिताना कुठेही कटुतेचा लवलेश दिसणार नाही हे पाहिले आहे. वाळिंबे यांच्या राजीनाम्याविषयी त्यांनी लिहिले आहे, पण त्या काळात केसरीत काय चालले होते ते त्यांना किंवा वाळिंबे यांना माहीत असायचे कारण नव्हते. आम्ही आत

---

**(पान ९ वरून)**

पुस्तक करतं. आपणही ते दर्शन घडवण्याच्या उद्देशानंच पुस्तकाची रचना करता. त्या रचनेसाठी प्रवास करता, माहिती मिळवून आणता. मला वाटतं, मराठी समाजावर आपण केलेले मोठे उपकार आहेत. माणसालाच त्याच्या माणूसपणातल्या एका गलिच्छ वैगुण्याची जाणीव आणि ओळख करून देण्याचं आवश्यक कार्य आपल्या पुस्तकातून घडतं.

पुस्तक वाचताना मनाच्या चिरफळ्या उडतात हे खरं असलं, तरी मराठी साहित्य समृद्ध करण्याच्या बाजूनं हे पुस्तक अप्रतिम आहे. ज्यूंच्या झालेल्या संहाराच्या वास्तव कहाण्या बारीकसारीक तपशिलांसह आपण मांडल्या आहेतच, पण सोबत ती वास्तवता आणखी वास्तव होण्यासाठी आपण त्या संदर्भातली भरपूर (आणि नेटकी छापलेली) छायाचित्रंसुद्धा दिली आहेत. संहार-छावण्यांची यादी, आणि त्या छावण्यांचा बाकी तपशील देऊन आपला विषय व्यापक केला आहे.

मुद्दाम सांगण्याची बाब म्हणजे, अशी माहितीपर पुस्तकं भाषेच्या बाजूनं रुक्ष, रखरखीत होण्याची शक्यता असते. आपल्या पुस्तकात तसं न होता, ते वाचनीय भाषेतलं झालं आहे. जणू एखादा माहितगार मित्र समोर बसून आपल्याशी बोलतो आहे, अशी आपल्या लिखाणाची भाषा आहे.


एकच बारकी आणि महत्त्वाची गोष्ट राहिली. एवढ्या मोठ्या प्रमाणात ज्यूंचा खातमा करायला हिटलर का उद्युक्त झाला, हिटलरच्या दृष्टीनं ज्यूंच्या चुका काय झाल्या हेही आपण सांगायला पाहिजे होतं. ते राहून गेलं.

पण वाचणाऱ्याला आपलं पुस्तक सुन्नबधिर करणारं आहे हे निश्चित. त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे माणसाच्या जातीनं काय जगू नये हे सांगणारं आहे. कोणत्या प्रकारचं जगणं टाळायला हवं, हे कळून घेण्यासाठी तरी मानवजातीतल्या प्रत्येकानं हे पुस्तक वाचायला हवं.

---

**राजन खान**, पुणे
मोबाइल : ९४२२० ०५०६५

राहून ते सगळे पाहत होतो. कधीकधी आम्हालाही वाटे की द्यावा राजीनामा आणि व्हावे चालते. पण जाणार कुठे हा प्रश्न होता. कट्टर भांडवलदारविरोधी भूमिका असणारे माझ्यासारखे काहीजण तर आपण दुसऱ्या प्रतिस्पर्धी वृत्तपत्राच्या दारात उभे राहणे म्हणजे आपल्या तत्वज्ञानाचे पराभव मानणारे होते. संघीय विचारसरणी कदापिही मान्य होणे शक्य नसल्याने 'तरुण भारत'चा विचार करताही येणे शक्य नव्हते. स्वाभाविकच हेही दिवस जातील यावर आमची श्रद्धा होती. चंद्रकांत घोरपडे हे आमचे खरेखुरे मास्तर. आमच्यापैकी बहुतेकांना लिहावे कसे, शब्दांचे महत्त्व काय, कोणते शब्द कशा पद्धतीने वापरायला हवेत हे समजावून सांगणारे आणि मराठीचे कट्टर समर्थक. त्यांना एखाद्या वाक्यात इंग्रजी किंवा हिंदी शब्द वापरलेलाही चालत नसे. त्यांच्या दर मंगळवारच्या संपादकीय बैठकांना नेहमीच रंग भरत असे. एखाद्या उर्दू किंवा हिंदी गाण्याचा अर्थ नेमका कोणत्या अंगाने घ्यायला हवा हे आम्हाला त्यांनीच शिकवले. केसरीत असताना वाळिंबे कधीही या बैठकांना हजर राहायचे नाहीत. त्यांचे आणि घोरपडे यांचे सख्य जिवाभावाचे होते. वाळिंबे आणि घोरपडे नेहमी स्वतंत्रपणे चहाला जात तेव्हा आम्ही त्यांच्याबरोबर कधीच जात नसू. एकदाच असा प्रसंग होता की त्यांनी आम्हाला त्यांच्यात सामील करून घेतले होते. तेव्हाची आमची तशी बच्चे कंपनीच होती. घोरपडे यांचा स्वभाव संशयी होता. त्यामुळे कार्यालयातले कोणीही दोघे एकत्र आले की ते आपल्याविरुद्ध कटकारस्थाना-साठीच एकत्र आलेले असणार अशी त्यांची 'खात्री'च असायची. संपादकीय बैठकीतच तसे ते स्वच्छ बोलून दाखवायचे. चुका घडल्यास मेमो देऊनच त्या करणाऱ्यास वठणीवर आणता येते यावर त्यांची 'श्रद्धा' होती. आजचा खुला जमाना तर त्यांना अस्वस्थ व्हायला भाग पाडणारा वाटला असता. वाळिंबे यांचे तसे नव्हते. एकदम दिलखुलास माणूस. त्यांनी केसरी सोडल्यावरही माझी आणि त्यांची भेट होत असे. पण कधीही, अगदी चुकूनसुद्धा त्यांनी केसरीचे नावही घेतले नाही. पुढे मीच जेव्हा संपादक झालो तेव्हा ते समोरून येतायेताच विचारायचे, 'काय संपादक काय म्हणताय?' त्यांच्याकडे तुसडेपणा तर नावालाही नव्हता. विनितातार्इंनी त्यांचे केसरी सोडणे किंवा त्यांना तो सोडायला भाग पाडणे याविषयी तपशिलात न जाताही अतिशय हळुवारपणाने त्याची नोंद घेतली आहे. त्या काळात एखाद्या पत्रकाराकडे फोन असणे ही तशी दुर्मीळ गोष्ट नव्हती आणि वृत्तपत्रात काम करणाऱ्यांना तर तो मिळवणे तेवढे अवघडही नव्हते. पण आपल्याला सोडून गेलेल्या किंवा सोडायला भाग पडलेल्या कुणाकडेही तो दुसऱ्या सेकंदापासूनही असता कामा नये असे वाटणारे बरेचजण तेव्हा होते. पण त्यामध्ये जयंतराव नक्कीच नव्हते. घोरपडे यांचा स्वभाव मात्र तसा होता. वाळिंबे यांचा फोन त्याच दिवशी संध्याकाळी कापायला केसरीच्या दोघांना पाठवल्याचा प्रसंग त्यांनी अगदी बेताने लिहिला आहे. हे सारे धक्के वाळिंबे यांना नवे नसतीलही कदाचित, पण विनितातार्इंना असावेत. इथे आणखी एका गोष्टीचाही उल्लेख करायला हवा. तो म्हणजे वाळिंबे हे केसरीमध्ये ज्या टेबलावर काम करत असत, ते असे काही जगावेगळे नव्हते. पण तेही त्याच दिवशी शिपायांमार्फत आपल्या खोलीत आणून ठेवण्याचा अट्टहास घोरपडे यांनी केला होता. अशा कितीतरी गोष्टी आहेत की आम्ही त्या प्रत्यक्ष अनुभवलेल्या आहेत. आज आता त्या लिहिणे योग्य की अयोग्य हा भाग सोडून दिला तरी वाळिंबे यांच्याविषयी लिहिताना




त्यांचा उल्लेख केला जाणे अपरिहार्य होय.

विनितातार्इंनी हे चरित्र घडले तसे आणि जसे होते तसे तयार केले आहे. या आठवणींना प्रा.द.मा. मिरासदारांची प्रस्तावना लाभली आहे. मिरासदारांच्या भाषेत सांगायचे तर 'वाळिंबे यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलू निरनिराळ्या आठवणींमधून विनितावहिनींनी या आत्मकथनात वाचकांना घडवले आहेत. ते प्रत्ययकारी आहे.' वाळिंबे यांचे निधन २२ फेब्रुवारी २००० रोजी झाले. म्हणजे त्यालाही आता दहा वर्षे होऊन गेली. त्यांचे चिरंजीव अभिजीत यांनी वाळिंबे यांच्यावर ग्रंथ काढायचा निर्णय पक्का केला. या चरित्राच्या निमित्ताने वाळिंबे यांना अनेकांनी शब्दबद्ध केले असले तरी प्रत्यक्षात लेखक हा चिरकाल टिकणारा विषय असतो आणि तो त्यांच्या लेखनाच्या रूपाने रसरशीत स्वरूपात नियमितपणे आपल्याला पाहायला मिळतो, हे यापूर्वीही अनेकदा दिसून आले आहे आणि यापुढेही ते कायम राहणार आहे. वाळिंबे हे त्यांच्या 'नेताजी' ने वाचकांच्या मनात घर करून राहतील. त्यांच्या 'हिटलर'ने राहतील किंवा 'व्होल्गा जेव्हा लाल होते' ने राहतील. पण या सर्वांवर माझ्या मते त्यांच्या कोणत्या ग्रंथाने कडी केली असेल

तर ती '१८५७ ते १९४७' या त्यांच्या अजरामर ग्रंथाने. या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाला जयंतराव आणि शरद पवार उपस्थित होते आणि त्यांची त्या समारंभातली भाषणे म्हणजे एकसे बढकर एक होती.

या सर्व पार्श्वभूमीवर मी या 'साठवणीतल्या आठवणीं'कडे पाहत आहे. जयंतराव हा आम्हा सर्वांच्या दृष्टीने लोहचुंबक होता. सर्वांनाच आकर्षित करणारा आणि खिळवून ठेवणारा. वाळिंबे यांना जशी परदेशी जायची संधी मिळाली तशी आमच्या त्या पिढीतल्या बहुतेकांना मिळाली. त्यातही पुन्हा कोणी परदेशी जाणार म्हटल्यावर जयंतरावांना होणारा आनंद हा त्या परदेशी जाणाऱ्यापेक्षा काकणभर जास्तच होत असे. परदेशी शिक्षणासाठी जाणारा शिकून आल्यावर आपल्या वृत्तपत्रालाच फायदा होणार आहे हे त्यांनी गृहित धरलेले असे. वाळिंबे यांच्या पत्नीनेही त्यांच्या परदेशी जाण्याचे सर्व श्रेय अर्थातच जयंतरावांनाच दिले आहे. ज्या ज्या वेळी अशा व्यक्तींना निरोप द्यायचा प्रसंग येत असे तेव्हा जयंतरावांचे छोटेसेच भाषण त्यांच्या वेगवेगळ्या पैलूंची साक्ष देत असे.

केसरी आणि वाळिंबे या प्रकरणामध्ये केसरीशी वाळिंबे यांचा संबंध कसा आला हे स्पष्ट करण्यात आले आहे. सन १९६२मध्ये केसरी दैनिक स्वरूपात निघणार आहे, असे वाळिंबे यांना केसरीतच सहसंपादक असणारे य.वि.नामजोशी यांनी सांगितले. केसरीला वृत्तसंपादक हवा असल्याने तुम्ही अर्ज करा, असे त्यांना सुचवण्यात आले. वाळिंबे यांना दैनिक वृत्तपत्र व्यवसायामध्ये परतायची ही नामी संधी होती. जयंतराव या संस्थेचे सर्वेसर्वा होते तरी ते मालक म्हणून कधीही आम्हापैकी कुणाशीही वागले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. इथे त्यांचा उल्लेख मालक-संपादक केला आहे. अर्थात तो अनवधानाने असला पाहिजे. दैनिकाच्या कामापासून दहा वर्षे दूर होते, त्यामुळे जयंतरावही त्यांच्याविषयी साशंक होते. स्वाभाविकच त्यांना वाळिंबे यांनीच आपण रात्रपाळीला येऊन काम करून दाखवतो, असे सांगितल्याने जयंतरावही त्यांची परीक्षा घ्यायला तयार झाले. वाळिंबे यांनी रात्री येऊन अंक काढून दाखवला, त्यावर जयंतराव खूष झाले आणि वाळिंबे यांच्या आईलाही अतिशय आनंद झाला. ते स्वाभाविकही होते. वाळिंबे यांच्या बरोबर काम करणाऱ्यांमध्ये दिनकर गांगल, अरुण साधू, अशोक जैन हे आधीच्या पिढीचे, तर दिलीप चावरे, सुभाष नाईक, विजय कुवळेकर हे माझ्या पिढीचे होते. वाळिंबे यांना 'टॉमसन फाउंडेशन'ची शिष्यवृत्ती मिळाली होती. ती मिळवणारे ते बहुधा पहिले मराठी पत्रकार होत. परदेशगमन आणि अन्य भाग हा त्यानंतरच्या प्रकरणामध्ये येतो. वाळिंबे यांच्या प्रवासवर्णनाचा भाग नंतर येतो. वाळिंबे यांनी इंग्लंडहून परतल्यावर तिथल्या वर्णनाचा पहिला-दुसरा भाग केसरीत लिहिला. त्यावरूनच त्यांना ते पुस्तकरूपाने ते प्रसिद्ध करायला गळ घालायला आलेले प्रकाशक आणि 'आज इथे, उद्या तिथे' या नावाने प्रसिद्ध झालेले त्यांचे हे प्रवासवर्णन वाचनीय ठरले. वाळिंबे फार सोपे लिहायचे. इंग्रजीच्या वाचनातून त्यांना हा सोपेपणा कमावता आला होता.

वाळिंबे यांच्याकडे केसरीची रविवार पुरवणी सोपवण्यात आली आणि त्यांनी तिचे अक्षरशः सोने करून दाखवले. रविवार पुरवणीवरून तुमचा मुख्य अंक वाचकांकडून विचारात घेतला जातो, असे जयंतराव म्हणायचे. ते त्यांनी त्यात उतरवून दाखवले होते. याच काळात केसरीत ग.दि. माडगूळकर, पु.ल. देशपांडे, द.मा. मिरासदार, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, पु.भा. भावे, गं.बा. सरदार, प्रभाकर पाध्ये, रा.चिं. ढेरे, पु.ग. सहस्रबुद्धे यांची लेखणी तळपायला लागली. त्या काळात प्रतिस्पर्धी दैनिक भाजीपाला पिकवावा कसा किंवा कोणत्या तरी ताईंच्या सल्ल्याचे स्तंभ चालवत होता. असो. वाळिंबे यांनी वाचकाची नस अचूक पकडली आणि त्याला समृद्धीच्या दिशेने नेले. जयंतरावांची राज्यसभेवर झालेली निवड आणि त्यानंतर त्यांनी लिहिलेली खुसखुशीत 'अशी ही दिल्ली' या सदरातली रंजक वार्तापत्रे हा आधुनिक पत्रकारितेचा एक उत्तम नमुना होता. त्यामध्ये जयंतराव बऱ्याचदा शेरोशायरीचा वापर करायचे आणि त्या सदराला खुलवायचे काम वाळिंबे यांच्याकडून केले जायचे. केसरी, महाराष्ट्र टाइम्स आणि लोकसत्ता यांच्याच पुरवण्यांची चर्चा वाचकांमध्ये त्या काळात जास्त होत असे. वाळिंबे यांचा चढता आलेख कुणाला पाहवला नाही, असेही असेल. पण वाळिंबे यांना ज्या तऱ्हेने केसरी सोडायला सांगण्यात आले ते आम्हापैकी अनेकांना मान्य होण्यासारखे नव्हते, पण इलाज नव्हता. केसरी प्रकाशनातर्फे वाळिंबे यांच्या 'हिटलर'चे प्रकाशन व्हायचे होते. पण छापलेले फॉर्म एका दिवशी परत पाठवून ते काम थांबवण्यात आले. वाळिंबे यांच्या अगदी जवळच्या मित्राने त्यांना दगा दिला अशी तेव्हाची भावना होती, ती मात्र कुणाच्याच मनातून पुसली गेली नाही. वाळिंबे यांच्या कुटुंबावर काय कोसळले असेल याची कल्पना तेव्हा कुणीही करू शकले असते पण हा नाजूक मानसिकतेचा भागही तेव्हा मान्य केला गेला नाही. असे हे बरेच काही. ज्यांना त्या काळच्या या परिस्थितीचा अस्सल इतिहास माहीत करून घ्यायला असेल त्यांच्यासाठी आणि एकूणच वाळिंबे या व्यक्तीविषयी ज्यांना काहीही माहिती नाही अशांसाठीसुद्धा या 'साठवणीतल्या आठवणी' उपयुक्त ठरतील.

---

**अरविंद गोखले**
arvindgokhale@gmail.com

**साठवणीतल्या आठवणी**
लेखिका : विनिता वाळिंबे,
प्रकाशक : अभिजित प्रकाशन, पुणे.
पृष्ठे : १०४, किंमत : १०० रुपये

# शालिनीताई पाटील यांचे आत्मकथन

## वसंतदादांवर दोषारोप

### वसंत वासुदेव देशपांडे

सार्वजनिक जीवनातील कर्तृत्ववान दाम्पत्यामध्ये आचार्य कृपलानी-सुचेता कृपलानी, चिंतामणराव देशमुख-दुर्गाबाई देशमुख, श्यामराव परुळेकर-गोदुताई परुळेकर, बंडू गोरे-मृणाल गोरे, मधु दंडवते-प्रमिला दंडवते, वसंतदादा पाटील-शालिनीताई पाटील यांसारख्या दाम्पत्यांची नावे सर्वपरिचित आहेत. यातील काही अर्धांगिनीची आत्मचरित्रे प्रसिद्ध झाली आहेत. गोदुताईंचे आत्मचरित्र म्हणजे तर ठाणे जिल्ह्यातील वारली या आदिवासी जमातीच्या उत्थानाचा इतिहास आहे. शालिनीताई पाटील यांचे 'संघर्ष' हे आत्मचरित्र १६ ऑगस्ट २०१० रोजी प्रकाशित झाले. शालिनीताईंनी वसंतदादांची पत्नी, सचिव, मित्र, सहकारी आणि सल्लागार या भूमिका वठविल्या. 'मला त्या नीटपणे वठविता आल्या' असे त्यांनीच या आत्मचरित्रात म्हटले आहे.

वसंतदादा हे ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी; अल्पशिक्षित असूनही आमदार, खासदार, मंत्री, मुख्यमंत्री, खासदार या पदावर स्वत:च्या कार्यकौशल्याचा ठसा त्यांनी उमटविला. काँग्रेस संघटनेत प्रदेशाध्यक्ष आणि काँग्रेस महासमितीचे सरचिटणीस या पदावरुन राज्याच्या आणि देशाच्या राजकारणात ते दीर्घकाळ सक्रीय होते. सहकार महर्षी हा सन्मान त्याच्याकडे चालत आला. परंतु या सर्वांपेक्षा लोकसंग्राहक नेता अशी त्यांची प्रतिमा. शालिनीताई आणि वसंतदादा यांचा पुनर्विवाह १९६४ मध्ये झाला. एक विधवा आणि एक विधुर यांच्या पुनर्विवाहाची कायदेशीर नोंदणी मात्र १९७०मध्ये झाली. उभयतांच्या वैवाहिक जीवनातील शेवटची काही वर्षे दोघांचा दुरावा अधिक वाढवणारी ठरली. वसंतदादांचे जे चरित्र १९८५ मध्ये प्रसिद्ध झाले, त्यात शालिनीताईंचा उल्लेखही नाही. त्यामुळे त्या दुखावल्या गेल्या. वसंतदादांबरोबर असलेल्या आपल्या नात्याबद्दल त्यामुळे संशय निर्माण होऊ शकतो, विरोधकांनी तो केलाच, अशी त्यांची तक्रार आहे. माजी मुख्यमंत्री ए.आर.अंतुले यांच्यावरील खटला १९८६मध्ये पुन्हा सुरू झाला. त्यावेळी न्यायालयात अंतुले यांच्या वकीलांनी या नात्यांची चर्चा केली. ऑक्टोबर २००९मध्ये विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनीही या नात्यासंबंधातच अपमानकारक भाषा वापरली. हे सर्व लक्षात घेतल्यानंतर सत्य काय ते लोकांना कळावे म्हणून विवाहाबद्दलच्या कागदोपत्री पुराव्यासह आपण आत्मचरित्र प्रसिद्ध करण्याचे ठरविले, असे स्पष्टीकरण त्यांनी आत्मचरित्राच्या आरंभी मनोगतामध्ये दिले आहे.

वसंतदादा आणि शालिनीताई यांच्या नातेसंबंधाबद्दलचे संशय निराकरण हे आत्मचरित्राचे एक उद्दिष्ट असल्याने साहजिकच उभयतांच्या विवाह नोंदणीचे प्रमाणपत्र, विवाहास उपस्थित असलेल्यांची पत्रे यांचा समावेश त्यात आहे. अन्य पुरावे म्हणून उभयतांच्या नावाने कनिष्ठ सुपुत्र राजेंद्र यांच्या विवाहाची काढलेली निमंत्रण पत्रिका (२३ एप्रिल १९८५), अन्य दस्तावेज, प्रवासातील तसेच समारंभातील उभयतांची छायाचित्रे मोठ्या संख्येने 'संघर्ष'मध्ये आहेत. विवाहाबद्दलचे पुरावे सहसा कोणाच्या आत्मचरित्रात नसतात. परंतु शालिनीताईंनी संभ्रम दूर करण्यासाठी ते मुद्दाम दिले आहेत.

'संघर्ष' असे या आत्मचरित्राचे नाव आहे. मात्र 'आत्मचरित्र डायरी' असा जोड शब्दप्रयोग 'संघर्ष'नंतर करण्यात आला आहे. डायरी या शब्दामुळे तारीखवार नोंदी 'संघर्ष'मध्ये असतील असा वाचकांचा समज होईल. परंतु तशा तारीखवार नोंदी नाहीत, मात्र कालानुक्रमाने आत्मचरित्राचे लेखन केले असल्यामुळे डायरी अशी आणखी एका शब्दाची जोड त्यांनी दिली असावी. मात्र तारखा आणि सन, स्थळे याबद्दल बराच गोंधळ 'संघर्ष'मध्ये आहे.

शिवनेरी किल्ल्यावर १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेचा नेत्रदीपक सोहळा पं. नेहरूंच्या हस्ते झाला, त्याला आपण उपस्थित होतो, असे शालिनीताईंनी पान २७ वर म्हटले आहे. वास्तविक शिवनेरी किल्ल्यावर २७ एप्रिल रोजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते पाच दिवसांच्या महाराष्ट्र राज्य स्थापना सोहळ्याचे उद्घाटन झाले होते. त्याला पं.नेहरू उपस्थित नव्हते. नेहरूंच्या उपस्थितीतील कार्यक्रम ३० एप्रिलच्या मध्यरात्री राजभवनावर झाला. यापैकी कोणत्या कार्यक्रमाला त्या उपस्थित होत्या? असाच गोंधळ ''नव्या राज्याला मुंबई राज्य नाव देण्याचा यशवंतराव चव्हाण यांचा विचार होता, परंतु आचार्य अत्रे यांनी महाराष्ट्र या नावाबद्दल आग्रह धरला त्यामुळे महाराष्ट्र नाव मान्य झाले'' या पान २८वरील उल्लेखात आहे. विधिमंडळाने मार्च १९६० मध्ये जे राज्य पुनर्रचना विधेयक मंजूर केले, तेच मुळी नव्याने स्थापन होणाऱ्या राज्याचे नाव महाराष्ट्र राहील या कायदेमंत्री शांतिलाल शाह यांनी मांडलेल्या सुधारणेसह. त्यामुळे महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर राज्याच्या नावाची चर्चा सुरू झाली हे

शालिनीताईंचे विधान चुकीचे ठरते.

मे १९६४ मध्ये पं.नेहरूंच्या उपस्थितीत मुंबईत झालेले काँग्रेसचे अधिवेशन, आणीबाणीच्या शेवटच्या पर्वात पंतप्रधान इंदिरा गांधीनी जाहीर केलेल्या लोकसभा निवडणुका याबाबतही तारखांची गल्लत या आत्मचरित्रात आहे. त्याचबरोबर काँग्रेस (मु) आणि काँग्रेस (एस्) या दोन वेगवेगळ्या पक्षांचा उल्लेख काँग्रेस (एस्) असाच करून शालिनीताईंनी तेव्हाच्या घटनाबद्दल लिखाण केले आहे. त्यांचे हे राजकीय अज्ञान म्हणावे काय? शरद पवार यांनी काँग्रेस (एस्) पक्षाची स्थापना १९७८ मध्ये काँग्रेस (मु) मधून बाहेर पडल्यानंतर पुलोद सरकार स्थापनेच्या वेळी केली. परंतु 'संघर्ष'मध्ये मार्च १९७८ मध्येच काँग्रेस (एस्) पक्ष अस्तित्वात होता असे समजून लेखन झाले आहे.

'संघर्ष'मध्ये वसंतदादांचे जी प्रतिमा उभी करण्यात आली आहे. ती वसंतदादा हे मत्सरी आणि पत्नीच्या उत्कर्षात अडथळा निर्माण करणारे पती अशी आहे. सन १९८०मध्ये विधानसभा निवडणुकीनंतर आपणाला मुख्यमंत्रीपदाची संधी आली होती. परंतु ती दादांनी आपणाला मिळू दिली नाही. ''प्रत्यक्ष नवराच आपल्या पत्नीला उघडपणे विरोध करून तिचे खच्चीकरण करतो असे संपूर्ण देशातील हे एकमेव उदाहरण असेल'', अशा शब्दांत शालिनीताईंनी आपला कडवटपणा प्रकट केला आहे. आपणाला १९८०मध्ये वसंतदादांनी मुख्यमंत्रीपदाची संधी मिळू दिली नाही. परंतु बाबासाहेब भोसले यांनी १९८३च्या सुरुवातीस मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला तेव्हा रामराव आदिक नेतेपदाच्या स्पर्धेत असताना आणि त्यांनी त्यांच्या मंत्रिमंडळात नंबर दोनचे स्थान देण्याचा निरोप पाठविला असताही आपण काही आमदारासह वसंतदादांची साथ केली आणि पत्नीधर्माचे पालन केले असे त्या सांगतात. त्यामुळेच रामरावांपेक्षा दोन अधिक मते मिळून वसंतदादांची नेते म्हणून निवड झाली आणि ते मुख्यमंत्री झाले असे शालिनीताईंनी नमूद केले आहे.

''शेवटच्या काळात त्यांनी माझा द्वेष केला. मत्सर केला. माझे राजकीय व सामाजिक नुकसान करण्याची पुरेपूर व्यवस्था केली. काँग्रेस पक्षात माझी सर्व ठिकाणी अडवणूक केली. इंदिराजी गांधी आणि यशवंतराव चव्हाण हे दोन माझे आधारस्तंभ कोसळल्यानंतर तर वसंतरावदादा एकदमच मोकाट सुटले आणि त्यांनी माझ्या अनेक वर्षांच्या राजकीय वनवासाची व्यवस्था केली,'' अशा कमालीच्या कटु भाषेत शालिनीताईंनी दादांचे चित्र वाचकांपुढे उभे केले आहे.

शालिनीताईंचे हे आत्मचरित्र सुनीता देशपांडे आणि माधवी देसाई यांच्या निर्भीड आत्मचरित्राच्या रांगेतील असल्याचे पुस्तकाच्या प्रकाशकांनी म्हटले आहे. वाङ्मय विलासाच्या हौसेखातर त्यांनी ते लिहिलेले नाही असे प्रकाशकांनीच नमूद केल्यामुळे साहित्यगुणाच्या निकषावर या आत्मचरित्राची त्या दोन आत्मचरित्रांशी तुलना करण्याचे प्रयोजनच रहात नाही. बहुजन समाजातील या सुशिक्षित स्त्रीने चार मुले पदरी असताना पतीचे निधन झाल्यानंतर पुढे काय करायचे अशा द्विधा मनस्थितीत वसंतदादा पाटील यांच्याकडून पुनर्विवाहाचा प्रस्ताव आल्यानंतर तो विचारान्ती स्वीकारला. त्यावेळी वसंतदादांच्या पत्नी आजारी होत्या. परंतु ते आजारपण बरे न होणारे होते. त्यांना सहचारिणीची गरज होती. या दोघांनी विवाहाचा निर्णय १९६४ मध्ये घेतला. त्यावेळीही वसंतदादा काँग्रेसचे प्रसिद्ध नेते आणि आमदार होते. त्यामुळे विवाहाच्या बातमीमुळे दक्षिण महाराष्ट्रात खळबळ उडाली. परंतु विवाहाच्या विरोधात उठलेल्या त्या प्रचंड झंझावातात ख्यातनाम लेखक वि.स.खांडेकर यांनी या विवाहाचे जोरदार समर्थन करणारा लेख प्रसिद्ध केला. वसंतदादा आणि शालिनीताई एकमेकांच्या गरजेतून एकत्र येत आहेत. विवाह हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे. इतरांनी त्यासंबंधात पुरेशी माहिती न घेता आपली मते बनवू नयेत असा परखड सल्ला खांडेकरांनी या लेखाद्वारे दिला होता.

शालिनीताईंचे उच्च शिक्षण, कायद्याची पदवी, लोकल बोर्ड सभासद आणि समाजकल्याण मंडळाच्या संघटक या पदावरील नोकरीत मिळालेला अनुभव या शिदोरीवर त्यांनी वसंतदादांना साथ देण्यास सुरुवात केली. वसंतदादा अल्पशिक्षित असल्यामुळे त्यांच्यात जी उणीव होती. ती पूर्णपणे भरून निघाली. शालिनीताईंना १९८०मध्ये विधानसभेवर निवडून येण्याची संधी मिळणे, अंतुले यांच्या मंत्रिमंडळात त्यांचा समावेश होणे, संसदेत निवडून येणे या सर्व राजकीय घडामोडीत त्या वसंतदादांच्या पत्नी असल्याचे योगदान नाकारता येणार नाही. संधी मिळाल्यानंतर शालिनीताईंनी त्यांची गुणवत्ता दाखवून दिली हे खरेच आहे. वसंतदादा आणि ताईंचे पहिले पती श्यामराव जाधव हे दोघेही शालिनीताईपेक्षा वयाने कितीतरी अधिक मोठे. त्यामुळे अपरिचित व्यक्तींचा ते शालिनीताईंचे वडील असाही गैरसमज होई. अशा प्रतिकूल वातावरणात शालिनीताईंना प्रगतीची वाटचाल करावी लागली. ''माझे आयुष्य म्हणजे नियतीचे खेळ. मी कोणालाही दोष देत नाही,'' असे त्यांनी म्हटले असले तरी वसंतदादाबद्दलचे त्यांनी ज्याप्रकारे लेखन केले आहे. ते दोष देणारेच असल्याचे वाचकाचे मत होईल.

महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींचा ज्यांना परिचय आहे. त्यांना शालिनीताईंचे हे आत्मचरित्र वाचल्यानंतर शालिनीताई 'मी पणाने' स्वत:कडे बऱ्याच बाबतीत श्रेय घेत आहेत असे वाटल्याखेरीज राहणार नाही. मुंबईचे महापौर म्हणून मनोहर जोशी यांची निवड, महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नी जानेवारी १९८४ मध्ये सीमाभागातील महाराष्ट्र एकीकरण समितीच्या पाच आमदारांसह पंतप्रधान इंदिरा गांधींबरोबर झालेली चर्चा या घटनांच्या वर्णनात त्यांनी स्वत:कडे श्रेय घेतले आहे.

वसंतदादांच्या निधनानंतर दहा वर्षांनी म्हणजे १९९९मध्ये शालिनीताई राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदार म्हणून निवडून आल्या. दहा वर्षे पुन्हा राजकारणात त्या सक्रीय राहिल्या. सातारा जिल्ह्यातील जरंडेश्वर सहकारी साखर कारखान्यातील उभारणी हे त्यांचे मोठे काम परंतु तो कारखाना आता मोडीत निघाला. हे नमूद करताना राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांचा जळगाव जिल्हातील संत मुक्ताबाई आणि माजी केंद्रीय मंत्री सूर्यकांता पाटील यांचा नांदेड जिल्ह्यातील हुतात्मा जयवंत या दोन आजारी व मोडीत निघालेल्या दोन कारखान्यांचा उल्लेखही त्यांनी केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर शालिनीताईंचे आरक्षणाच्या मुद्द्यावर मतभेद झाले. त्यांनी सन २००९ची विधानसभा निवडणूक क्रांतिसेना पक्षाच्या उमेदवार म्हणून लढविली परंतु त्या पराभूत झाल्या. आर्थिक निकषांवर आरक्षण हा मुद्दा घेऊन त्यांनी निवडणूक लढविली. 'मराठा समाजाने मला फार उचलून धरले', असे मनोगतामध्ये सांगणाऱ्या शालिनीताईंनी सभेमधील गर्दीचे प्रत्यक्ष मतांमध्ये रुपांतर होऊ शकले नाही, हे मान्य केले आहे. मराठा समाज हा त्यांच्या खास जिव्हाळ्याचा विषय असल्याचे आत्मचरित्रात अनेक ठिकाणी जाणवते. पहिल्या विवाहानंतर सासरच्या शेतकरी कुटुंबात एकावेळी एके ठिकाणी बसून शंभर भाकऱ्या कराव्या लागणाऱ्या स्त्रीचा संघर्ष वाचकांना स्त्री जीवनातील दुःखे व यातना यांची जाणीव करून देईल एवढी मात्र या आत्मकथानाची जरूर फलश्रुती आहे.

**संघर्ष**
प्रकाशक-विश्वमित्र प्रकाशन
बोरी (जिल्हा-पुणे)
किंमत २५० रुपये, पाने - १७१

---

**वसंत वासुदेव देशपांडे**
२६/२१३, उन्नतनगर २,
गोरेगाव (पश्चिम),
मुंबई - ४०० ०६२.
फोन - २८७८ २४१६

---

# दृष्टिहीन मुली-महिलांना स्वयंपूर्ण करणारा नॅब उत्कर्ष उपक्रम

**राजीव जोशी**

श्रावण महिना आला की सणवार येतात. बाजारामध्ये त्या-त्या सणाप्रमाणे वस्तू विकायला येतात. उदाहरणार्थ, राखी पौर्णिमा-रक्षाबंधनासाठी विविध प्रकारच्या राख्या, दिवाळीला पणत्या वगैरे. ही संधी साधून उत्पादक, व्यापारी अधिक नफा कमावत असतात. लोकांना आवडणाऱ्या चकाचक वस्तू विकून धंदा करत असतात. अशावेळी अंध-अपंगांद्वारे अशा वस्तू तयार झाल्या आणि त्या आपल्याला मिळाल्या तर... तुम्ही-आम्ही त्यांना मदत करणार का? त्यांनी केलेल्या राख्या, भेटकार्डे, पणत्या आपण विकत घेऊ शकतो आणि त्यामुळे त्यांच्या हाताला काम आणि उपजीविकेचे साधन उपलब्ध करून देऊ शकतो. असाच एक उपक्रम मुंबईतील 'नॅब' या संख्येद्वारे गेली अनेक वर्षे चालवला जातो, त्याबद्दल जाणून घेऊया-

रक्षाबंधन या सणाआधी बाजारात अनेक प्रकारच्या राख्या दिसू लागतात. लेटेस्ट फॅशनच्या, क्रिकेट-सिनेमा जगतातील गोष्टींचा प्रभाव त्यावर पडलेला असतो. चकाचक-आकर्षक राख्यांना साहजिकच मोठी मागणी असते. राख्या तयार करण्याचे काम हे मोठ्या प्रमाणावर चालते. आपण राख्या विकत घेताना ह्या गोष्टींचा विचार करत नाही. मुलांना आवडतील अशा रंगीबेरंगी, शोभिवंत घेण्याकडे आपला 'कल' असतो. किमती राखी घेऊन, मोठी राखी घेऊन आपली प्रतिष्ठा जपण्याचा आग्रहही असू शकतो. अशा शेकडो राख्या पाहत असताना, साधी किंवा त्यातल्या त्यात छानदार राखी- तीही एखाद्या अंध मुलीने/महिलेने केलेली आहे असे कळले तर... तर तुम्ही काय कराल? ती राखी घ्याल की, चकाचक नाही म्हणून बाजूला ठेवाल? थांबा, काही 'निर्णय' घेण्याआधी वस्तुस्थिती समजून घ्या.

एखादी मुलगी जन्मतः किंवा लहान वयात 'अंध' होते त्यामुळे काही जणींचे शिक्षण अर्धवट राहते किंवा थांबते. अशा वेळी त्यांनी घरातल्यांवर, इतरांवर अवलंबून राहायचे का? आणि परावलंबी जिणे जगायचे? का - कशासाठी?

ह्याकरिताच नॅब या संस्थेने अनेकविध उपक्रम हाती घेतलेले आहेत. नॅबबद्दल सांगायचे तर १९५२ पासून ही संस्था कार्यरत आहे. देशभरातील दृष्टिहीन मंडळींना त्यांच्या पायावर उभे राहण्यासाठी, त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी सातत्याने इथे कामे व वेगवेगळे प्रयोग/योजना आखल्या जातात. १९९१ मध्ये नॅबने एएसबीडब्ल्यू या विशेष समितीची स्थापना केली. ज्याचा उद्देश हाच आहे की अंध महिलांच्या प्रगतीसाठी, त्यांना स्वयंपूर्ण करण्याकरिता सर्वतोपरी योजना राबवणे. या समितीच्या वतीने महाराष्ट्रात तीन ठिकाणी-तीन जॉब डेव्हलपमेंट सेंटर (जेडीसीज्) - कार्यान्वित आहेत. मुंबई, अंबरनाथ आणि अलिबाग. इथे दृष्टिहीन मुली व महिलांना कामाचे प्रशिक्षण दिले जाते. 'शिका व कमवा' या तत्त्वाने थोडेफार उत्पन्नही मिळू शकते. स्वतःच्या पायावर उभे राहण्याकरिता जे काही काम किंवा कलाकुसरीची कामे करता येतील ते करून रोजगार मिळवता येतो.

अशा केंद्रात काम करण्याकरिता ज्या काही मूलभूत सुविधा लागतात- उदा: जागा, वीज व पाणी ह्या तर उपलब्ध करून दिल्या जातातच, शिवाय कच्चा माल, मार्गदर्शन, प्रशिक्षण, ऑर्डर मिळवणे व अंतिमत: विक्री करणे अशा अथपासून इतिपर्यंत गोष्टी केल्या जातात.

इथल्या प्रशिक्षण केंद्रात दैनंदिन पद्धतीने किमान असा स्टायपेंड दिला जातो जेणेकरून अशा मुली व महिलांमध्ये प्रशिक्षण घेण्याची आवड निर्माण व्हावी. कामात प्राविण्य मिळाल्यावर अधिक काम दिले जाते, ज्यामुळे त्यांना अधिक मजुरी मिळवता येते. स्वयंरोजगार कमावण्याचा, स्वत:च्या पायावर उभे राहण्याचा व त्याद्वारे दृष्टीहीनांना आपल्या चरितार्थासाठी 'चार पैसे' कमावून स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी प्रवृत्त करते.

या केंद्राद्वारे दरवर्षी राखी पौर्णिमेसाठी विविध प्रकारच्या राख्या हाताने तयार करण्यात येतात, त्यापैकी जवळपास १ लाख राख्या भारतीय जवानांसाठी तयार केल्या जातात. अंध मुली व महिलांच्या हातांनी सैनिकांच्या हातावर राखी बांधण्याचा सोहळा प्रतिवर्षी मुंबईच्या कुलाबा हेडक्वार्टर इथे संपन्न होतो. शिवाय, सीमेलगतच्या सैनिकांना राखी बांधण्यासाठी इथल्या मुलींना सन्मानाने नेले जाते. जणू सैन्यदलाचे पाहुणे नव्हे तर सर्वांच्या बहिणी असल्याचा मान दिला जातो.

दिवाळी आणि नाताळच्या आधी नॅबच्या या केंद्रामधून शोभिवंत तोरणे व आकर्षक मातीच्या पणत्या तयार करण्याचे काम जोरात चालू असते. या वस्तू एअर इंडिया, भारत पेट्रोलियमसारख्या नामांकित कंपन्या विकत घेतात आणि या रोजगार योजनेला मोलाचा हातभार लावतात. प्रशिक्षणार्थी मुली इथे काम करू शकतात आणि अन्य महिला काम घरी नेऊन करू शकतात. अशी कामे नेण्यासाठी व पूर्ण करण्यासाठी वांगणी, विरार, डोंबिवली अशा दूरदूरच्या उपनगरातून महिला येतात. हार्बर लाईनवरील रे-रोडसारख्या ठिकाणी असलेल्या या रोजगार केंद्रात येणे, कच्चा माल नेणे व तयार केलेल्या वस्तू आणून देणे ही एखाद्या डोळसाला लाजवेल अशी कामे या मुली व महिला करतात. हे एका प्रकारे दृष्टिहीनांचे सबलीकरणच आहे. अर्थात या केंद्रात मुले व तरुणांसाठी देखील वेगवेगळी प्रशिक्षणे दिली जातात. ह्या सर्वांमागे हेतू एकच, की त्यांना काम करता यावे, पैसे कमावता यावेत. घरच्यांना 'ओझे' वाटण्याऐवजी दृष्टिहीन असून हातभार लावण्याने जगण्याला 'अर्थ' प्राप्त करून देणारे स्वयंपूर्ण करणारे हे व्रत मुलुंडची अरुणा, वांगणीसारख्या दूरवरून येणारी मंगल, टिटवाळ्याची संगीता, गोवंडीची हिराबाई, भांडूपची सुरेखा, डोंगरावरून पडल्याने दृष्टी गेलेल्या डोंबिवलीच्या शुभांगी खांबल अशा अनेक मुली व महिला नॅबच्या केंद्रात येतात, कच्चा माल नेतात आणि वस्तू तयार करून आणतात. त्यांच्या हातातील कला, काम करण्याची जिद्द ह्यातूनच 'चार पैसे' कमावण्याचा आनंद त्यांना मिळतो.

इथे बनलेल्या वस्तूंचे, कलाकुसरींचे प्रदर्शन व विक्री लायन्स क्लब व जैन - मारवाडी समाजातर्फे भरवले जाते. अशी प्रदर्शने वर्षभर चालू असतात. याखेरीज उद्योगपती धीरूभाई अंबानींच्या मोठ्या तसबिरींना मोठ्ठे सुशोभित हार बनवण्याचे काम इथेच चालते. अभिषेक-ऐश्वर्या ह्यांच्या लग्नप्रसंगी झालेल्या मेजवानी समारंभात इथल्या मुली/महिलांनी कमळांची रोषणाई केलेली होती.

गेली १७ वर्षे हा उपक्रम चालू आहे. यासाठी सन्माननीय परिमला भट, खासदार सुप्रिया सुळे व एच.ओ.डी. रेवती देशपांडे ह्यांचे मार्गदर्शन व सक्रीय सहकार्य लाभलेले आहे. नम्रता शिंदेसारख्यांनी केलेली मन:पूर्वक सेवा आणि अन्य कर्मचाऱ्यांची साथ आहे. अनेक व्यक्ती व संस्था इथल्या कलाकुसरीच्या वस्तू घेतात आणि दिवाळी-नाताळ अशा सणांच्यावेळी मिठाई-कपडे आणून आनंद द्विगुणित करतात. पितृपक्षामध्ये पारंपारिक दान करताना इथल्या अंध मुली-महिलांना जेवण, गोडधोड देतात. वर्षातून एकदा- १८ जुलै या स्थापनेच्या दिवशी कर्मचारी व सदस्य सत्यनारायणाची पूजा करतात.

या उपक्रमाला सहानुभूतीची नव्हे सहकार्याची गरज आहे. इथे तयार होणाऱ्या वस्तू आपण स्वत: किंवा कॉर्पोरेट कंपन्यांनी विकत घेत राहिल्या तर इथे काम व रोजगार वाढू शकेल. दृष्टिहीनाला कमावता येत नाही म्हणून त्याला घरात-समाजात हीन वागणूक मिळू नये. ह्यासाठी आपण प्रोत्साहनपर खरेदी करू शकतो किंवा या उपक्रमाचे प्रमोशन करू शकतो. देणगी देऊन समाजकार्य करण्याऐवजी अंधांनी केलेल्या वस्तूंची खरेदी करून रोजगाराचे चक्र चालू ठेवता येईल. त्याकरिता एकदा व्हीजिट करून अंधांचे कार्य स्वत:च्या डोळ्यांनी पाहा-

संपर्क : **नॅब सी.ए.एस.बी.डब्ल्यू.**
रुस्तम अल्माईवाला, २४/१२७ कॉटन डेपो, रे रोड स्टेशन (पूर्व), मुंबई - ४०० ०३३.
फोन : ०२२- २३७२१६८१
nabcasbw@rediffmail.com
nabcasbw@yahoo.in

---

**राजीव जोशी**
rmjoshi52@yahoo.co.in

**पुढील अंक**
**दिवाळी अंक**
(ऑक्टोबर-नोव्हेंबर)
लिहिताहेत...
**गिरीश कुबेर, अच्युत गोडबोले, कुमार नवाथे, प्रभा पुरोहित, हेमंत देसाई, सुनील चावके, आशुतोष जावडेकर, संजय बोरुडे... आणि... बरेच काही!**
**मुखपृष्ठ - सुनील महाडिक...**

# वैचारिक आकलन आणि उद्दिष्ट

## सु.गो. तपस्वी

एका आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी जगभरातील प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. दिवसभरातील औपचारिक परिसंवादांनंतर संध्याकाळच्या स्नेह-भोजनाच्या वेळी एका टेबलावर काही प्रतिनिधींच्या गप्पा रंगात आल्या होत्या. वातावरण खेळीमेळीचे होते; हसतखेळत कोपरखळ्या व विनोदी किश्श्यांची देवाण-घेवाण चालली होती. संबंध आपुलकीचे, बरोबरीचे होते; टेबलावरील काही प्रतिनिधी तर पूर्वायुष्यात एकाच संस्थेत शिकले होते, पूर्वपरिचयातील होते.

दिवसभराचा तात्त्विक ताणतणाव दूर होऊन अनौपचारिक गप्पांचा फड जमला होता. ओघात, बढाया- शासनावर केलेल्या कुरघोड्या-प्रशासकीय तत्परता, अशा प्रकारच्या विषयांवरील विनोदांना उधाण आले होते. दरम्यान, स्वत:च्या प्रशासनाचा वरचष्मा दाखवण्यासाठी हुकुमशाही राष्ट्राच्या एका प्रतिनिधीने पुढील किस्सा सांगितला.

''एकदा, एक समाजसुधारक आमच्या राष्ट्राध्यक्षांकडे आला. अंमलात असलेल्या एका कायद्यातील दोन बाबी अडचणींच्या होत्या. तरी, काही कारणांसाठी शासनाला त्या तशाच हव्या होत्या आणि नेमक्या त्याच बाबींवरील सुधारणांचा विषय त्या सुधारकानं राष्ट्राध्यक्षांपुढे मांडला. अध्यक्षांना काय बोलावं ते लक्षात येत नव्हतं, परंतु सल्ला द्यायला आलेल्या त्या व्यक्तीला माझ्याकडे पाठवून अध्यक्षांनी त्या नेत्याला सांगितलं, की सर्व गोष्टींवर प्रथम प्रशासकीय चौकशी झाली पाहिजे, मगच योग्य तो निर्णय शासन घेऊ शकेल.''

टेबलावरील सौम्य हास्यानंतर भारतीय प्रतिनिधीने स्वत:चा अनुभव सांगितला. ''गेल्या वर्षी निवडणुका जवळ आल्या होत्या, तेव्हाची ही गोष्ट. कायद्यातील काही सुधारणांवर बोलण्यासाठी एक लोकप्रिय सामाजिक नेता प्रस्ताव घेऊन आमच्या पंतप्रधानांकडे आला. गमंत म्हणजे, पंतप्रधानांनी त्या नेत्याला पक्षात तर सामील करून घेतलंच, शिवाय लोकसभेचं तिकिटही देऊ केलं!''

पिकलेली खसखस विरत नाही तर ब्रिटिश प्रतिनिधीने समोरच्या जर्मन प्रशासकाला विचारले, ''आपल्यासारख्या विकसित लोकशाही देशांत असा सामाजिक प्रश्न घेऊन एखादा नेता आला तर काय होईल?'' जर्मन अधिकारी बोलायच्या आधी शेजारीच बसलेल्या अमेरिकन प्रतिनिधीनेच उत्तर दिले. ''अगदी सोपं आहे. संबंधित विशेषज्ञांची एक समिती स्थापन केली जाईल व त्या समितीवर 'चेअरमन' म्हणून त्याच नेत्याची नेमणूक केली जाईल!''

हास्याच्या उडालेल्या फवाऱ्यात नॅपकिनला हात पुसत आफ्रिकन देशांतील एक प्रतिनिधी उभा राहिला. एका हाताने दुसऱ्या हाताची मूठ कुरवाळत तो खाकरला आणि टेबलावर नि:शब्द शांतता पसरली! तणावमय वातावरणात भारदस्त आवाजात त्या प्रशासकाने बोलायला सुरुवात केली, ''कालापव्यय करणाऱ्या अशा खर्चिक उपायांपेक्षा आमच्या देशात सहसा अंमलात येणारा उपाय परिणामकारक व निश्चितच सोयीचा आहे.'' तो पुढे म्हणाला, ''आमच्या राजाने त्या सल्ला द्यायला आलेल्या सामाजिक नेत्याला तिथल्या तिथे गोळी घातली असती.'' ह्या वक्तव्यानंतर झालेला हास्यफोट मात्र जेवणघराचे छप्पर उडवून गेला.

सर्वत्र बोकाळलेल्या भ्रष्टाचारावर प्रकाश टाकणारी जेफरी आर्चर ह्या ब्रिटिश लेखकाची एक लघुकथा खूप गाजली होती. देशातील भ्रष्टाचारावर प्रकट व प्रखर टीका करणाऱ्या नायजेरियातील एका तरुण पुढाऱ्याची ती गोष्ट भ्रष्टाचाराबद्दल बरेच काही सांगून जाते. गोष्ट अशी -

नायजेरियाचा अध्यक्ष शासन-प्रशासनात बोकाळलेल्या भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या कामासाठी त्या तडफदार तरुणाची मुख्य अधिकारी पदावर नेमणूक करतो. सत्ताधारी अध्यक्ष त्या तरुण नेत्याला बोलावून सांगतो, ''कोणाचीही भीती बाळगू नकोस, काहीही क्षिती झाली तरी हरकत नाही; सर्व अधिकार देतो, पण वर्षभरात देशातील भ्रष्टाचार आटोक्यात आला पाहिजे.'' जोडीला, कोणाचीही व कोणत्याही प्रकारची चौकशी करण्याचे व कारवाईचे हक्क अध्यक्ष त्या नेत्याला देतो आणि त्याच्या व कुटुंबाच्या संरक्षणाची हमीसुद्धा घेतो. त्या नियुक्तीमुळे आणि त्यानंतरच्या कारवाईंचा परिणाम म्हणून पाच-सहा महिन्यांत अनेकांच्या मागे चौकशीचा ससेमिरा लागतो व त्या तरुण नेत्याबद्दल जनमानसात एक दबदबा निर्माण होतो.

चौकशीची सूत्रे गुप्ततेत हलत असतात आणि सर्वेसर्वा ठरलेला तो अधिकारी गैरव्यवहारांच्या चौकशीसाठी स्वित्झर्लंडमध्ये पोचतो. नायजेरियन व्यक्तींच्या स्विस बँकांतील खात्यांसंबंधात चौकशीचे सर्व अधिकार अध्यक्षांकडून लाभल्यामुळे उत्साहाने तो अधिकारी चौकशीला तळापासूनच सुरुवात करतो. मात्र, प्रत्येक पायरीवर त्याला थोडाफार निराशेचा अनुभव येतो व शेवटी एकच उत्तर मिळते; ते म्हणजे, ''या खास माहितीसाठी तुम्हाला माझ्या वरिष्ठांशी बोलावं लागेल.'' असे करता, करता तो झ्युरिकमधील

एका नामांकित बँकेच्या सर्वोच्च अधिकाऱ्याच्या केबिनमध्ये पोचतो व सोबतची महत्त्वाच्या कागदपत्रांची मोठी सुटकेस टेबलावर ठेवून स्थानापन्न होतो.

उत्तम स्वागत होते, सर्व आश्वासने मिळतात, काही माहितीही मिळते, उलगडे होतात; पण संबंधित व्यक्तींची नावे सांगण्याबाबत टाळाटाळ होत असल्याचे त्या नायजेरियन अधिकाऱ्याच्या ध्यानात येते आणि अखेरीस निर्वाणीचे असे उत्तर मिळते, ''व्यक्तींची नावं जाहीर करणं आमच्या तत्त्वाविरुद्ध आहे. प्राण गेला तरी खातेदारांची नावं सांगणार नाही अशी आम्ही शपथ घेतलेली असते.''

बँकेच्या सर्वोच्च अधिकाऱ्याचे ते उद्दाम निवेदन ऐकून तो नायजेरियन नेता खवळतो व सुटकेसमधील पिस्तूल काढून त्याची नळी तो स्विस अधिकाऱ्याच्या कपाळावर रोखून म्हणतो, ''बघुया तुझ्या शपथेची मर्यादा; नावं सांग नाही तर गोळी घालीन.''

तरीही तो अधिकारी मूग गिळून राहिलेला बघून तो नायजेरियन नेता पिस्तूल खाली ठेवतो व सुटकेस अधिकाऱ्याकडे ढकलत म्हणतो, ''मला तुमच्या बँकेत खातं उघडायचं आहे, ही रक्कम त्या खात्यात जमा करा!''

स्वित्झर्लंडमधील बँकांना, खरे म्हणजे, जगभरातील भ्रष्टाचाराचा एक महत्त्वाचा आधारस्तंभच मानले पाहिजे. अधिकृत व साळसूदपणे चालणाऱ्या ह्या स्विस बँकांचे व्यवहार ''इथून-तिथून सारी माणसं सारखी'' हे तत्त्वच सिद्ध करून देतात.

असे म्हटले जाते की व्यक्तिगत व सामाजिक मूल्यांच्या बंधनांना गरीब व अतिश्रीमंत वर्ग जुमानतोच असे नाही आणि समाजाच्या वागणुकीचे स्वरूप 'सुखवस्तू' मध्यमवर्गच ठरवत असतो. अशा मध्यमवर्गाचे प्रमाण जेवढे जास्त, तेवढा तो समाज सुसंस्कृत भासतो, एवढेच. या विधानाची साक्ष आपल्याला अनेक अनुभवांतून व वाङ्मयातून मिळत असते. एरवी सज्जन असणारी माणसे हलाखीच्या परिस्थितीत मूल्यांना बगल देताना दिसतात. आपद्धर्म म्हणूनही त्या गोष्टीकडे बघता येईल. परंतु, कायम हलाखीच्या परिस्थितीत जगणाऱ्या भारतासारख्या देशाच्या संदर्भात प्रस्तुत बाब आपण विसरता कामा नाही. दारिद्र्य-रेषेखाली जगणाऱ्या लोकांची भयंकर मोठी संख्या एकीकडे व दुसरीकडे अतिश्रीमंतांचे भयावह प्रमाण; ही विसंगती लक्षात घेता, अल्पशा मध्यमवर्गाची छाप भारतीय समाजवर्तनावर पडल्याचे कसे जाणवणार? म्हणूनच, समाजसुधाराच्या संदर्भात संबंधित प्रश्नांचा समग्र विचार होणे आवश्यक आहे. आजच्या पाश्चात्य सुसंस्कृत समाजाच्या शे-दोनशे वर्षांच्या इतिहासाचे विवेचनसुद्धा प्रस्तुत दृष्टिकोनातून महत्त्वाचे ठरते.

अशातच मागरिट मिचेल या लेखिकेची १९३६ मध्ये प्रकाशित झालेली 'गॉन वुईथ द विंड' ही कादंबरी परत वाचण्याचा योग आला. अठराशे साठच्या दशकातील दक्षिण व उत्तर अमेरिकेमधील 'सिव्हिल वॉर'च्या पार्श्वभूमीवरील ती कादंबरी वैयक्तिक व सामाजिक मूल्यांचे अतिउत्तम असे विवेचन अप्रत्यक्षपणे साधते; कोण बरोबर, कोणाचे चुकले, नक्की कोणाची वर्तणूक चुकली व का, या गोष्टींचा परिस्थितीजन्य निर्णय घेणे आपल्याला कठीण जाते. उगाच नाही पुलित्झर पारितोषिक विजेत्या या कादंबरीचा जगातील अठरा भाषांमध्ये अनुवाद झाला व आजवर, एक कोटीपेक्षा जास्त प्रती जगभरातील बाजारांत विकल्या गेल्या.

एकोणिसाव्या शतकात रुढ असलेली अमेरिकेच्या दक्षिण प्रदेशातील जमीनदारी व निग्रो गुलामगिरीची प्रथा आपल्याला बोचते व त्याच पार्श्वभूमीवर भुलवते ते त्याच समाजाचे परस्परावलंबनाचे आकलन आणि माणुसकीची वागणूक, शेजारधर्म पाळण्यातील उत्कटता. दुसऱ्या बाजूला उत्तरेकडील समाजाची समतेची मूल्ये आणि त्या आग्रहातून निग्रोंची गुलामगिरीतून मुक्तता करण्याची तळमळ जाणवते, परंतु खुपते ती त्यांच्याकडून दक्षिणेतील गोऱ्यांना दिली जाणारी क्रूर वागणूक व मुक्त झालेल्या निग्रोंना वाऱ्यावर सोडून दिल्याची भावना आणि त्या संदर्भात दिसून येणारी त्रयस्थता!

रॅचेल ओहारा, ॲशसे विल्किस आणि ऱ्हेट बटलर यांच्यातील एक प्रकारच्या वेगळ्या त्रिकोणावर आधारित असलेली ही कादंबरी, खरे तर तात्त्विक दृष्ट्या मानवी वर्तणुकीच्या विविध मूल्यांवर अनेक घटनांतून प्रकाश टाकते. दहा-बारा वर्षांच्या त्या कालावधीचे अत्यंत समर्पक व संदर्भासहित समग्र वर्णन करणारी, ॲटलांटाचा परिसर व त्या काळातील दक्षिणेतील चालीरीतींच्या, मूल्यांच्या कॅनव्हासवर रेखाटलेली ती हजारेक पृष्ठांची कादंबरी काहीशी लांबली आहे, परंतु त्याच सविस्तरतेमुळे, प्रत्येक घटनेद्वारे आणि विषद केलेल्या पार्श्वभूमीमुळे मानवी वर्तणुकीतील अनेक व्यवहारांचे आश्चर्यकारक विश्लेषण सुलभरीत्या साधले गेले आहे; व तेही साध्या, सोप्या विवेचनातून.

## आवाहन

राज्यभरातील दिवाळी विशेषांकांच्या माध्यमातून 'जनसंवाद' गट दरवर्षी एका 'जनजागृती उपक्रमा'चे आयोजन करतो. त्या उपक्रमाद्वारे महाराष्ट्रात सामाजिक विषयावर एक वैचारिक घुसळण साधली जाते. 'रुची' या मासिकासह राज्यातील वीसेक दिवाळी विशेषांक 'जनसंवाद'ला महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील वाचकांपर्यंत पोचण्यासाठी साहाय्य करतात. निवडलेल्या विषयावर वाचक आपापले विचार व्यक्त करून स्पर्धेत भाग घेतात. गेल्या वर्षीचा विषय होता 'सामाजिक मूल्ये' आणि यंदाच्या दिवाळी स्पर्धेचा विषय आहे 'सामाजिक बांधिलकी'. स्पर्धेबाबतची समग्र माहिती व नियम सहभागी झालेल्या सर्व दिवाळी विशेषांकांत प्रकाशित होतील; त्याकरिता वेगळी चौकशी करावी लागणार नाही. 'रुची'च्या वाचकांनी स्पर्धेत सहभागी होऊन उपक्रमाला उदंड प्रतिसाद द्यावा हेच त्यांना जनसंवादतर्फे आवाहन!

**संपादक**

हजारो वर्षांपूर्वी कृष्णाने अर्जुनाला गीतेतून उपदेश केला; कर्तव्याचे भान आणून दिले. परंतु, समग्र महाभारत वाचल्यानंतरच महाभारतातील अनेक पात्रांच्या वर्तणुकीला अर्थ प्राप्त होतो. गॉन वुइथ द विंड या शे-दीडशे वर्षांपूर्वीच्या अमेरिकन पार्श्वभूमीवर बेतलेल्या कादंबरीत सादर केलेल्या आधुनिक अनुभवांवरील कथनातून मार्गारेट मिचेलने सरळ सोप्या भाषेतून विषद केलेल्या घटना आपल्याला बऱ्याच जवळच्या वाटतात, सहज उलगडतात. लक्षात येते की सामाजिक मूल्ये जपण्यासाठी समजातील परिस्थितीही अनुकूल असावी लागते. माणसाचे सर्वांत मोठे शत्रू ठरतात ते गरिबी आणि आपापसात गटागटांतून निर्माण झालेले विभाजन व त्या विभाजनातून पोसले गेलेले वैमनस्य.

सामाजिक बांधिलकी, लोकशाही तत्त्वे, नागरिकत्व आणि नीतिमत्ता ह्या गोष्टी समाजजीवनात अत्यंत गरजेच्या आहेत, पण त्यांच्या पूर्ततेची अपेक्षा एखादा समाज करू शकतो, ती समाजाची पोटाची खळगी भरल्यावर, समाजातील सुबत्ता वाढल्यावरच! म्हणूनच असे वाटते, की भारतीय समाजाचे भवितव्य देशात येणारी समृद्धीच ठरवेल.

स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या साठेक वर्षांत देशातील सुखवस्तू मध्यमवर्ग वाढतो आहे. देशातील शासनाचे प्रयत्न त्याच दिशेने होत राहिले, मध्यमवर्ग संख्येने आणि टक्केवारीने वाढत राहिला आणि जोडीला समाज सुसंस्कृत करण्याचे प्रयत्न सामाजिक नेतृत्त्वाकडून होत राहिले तर येत्या पन्नासेक वर्षांत आपला समाजही सर्वार्थाने विकसित व संपन्न होईल. भौतिक समृद्धी व संपन्नता शासनाने वाढवावी व समाज सुसंस्कृत करण्याचे काम समाजधुरीणांनी सांभाळावे, ह्या तत्त्वानुसारच 'जनसंवाद' गटाची स्थापना वर्ष-दीड वर्षापूर्वी झाली व त्याच दिशेने या गटाचे प्रयत्न होत असतात व होत राहतील.

---

**सु.गो. तपस्वी**
समन्वयक, जनसंवाद
मोबाइल ९७६६१ ५२२५३

# एनएसएस युवकांनी राबवावा कोकणात भातलावणी प्रकल्प

## अभिजित हेगशेट्ये

रत्नागिरी येथील नवनिर्माण कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अॅण्ड सायन्स या महाविद्यालयाने राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत भातशेती लावणीचा एक अनोखा प्रयोग यावर्षी रत्नागिरी जिल्ह्यात प्रथमच केला. या माध्यमातून तरुण महाविद्यालयीन मुले-मुली शेतात उतरली. शेतनांगरणी, उकळ, बेर, चिखलणी, रोप काढणी, भातरोपांची लावणी जोरकसपणे आणि उत्साहाने केली. हा वेगळा प्रयोग खऱ्या अर्थाने कोकणच्या पारंपरिक भातशेतीला एक व्यापक संदेश देणारा आहे. आज शेकडो हेक्टर भातशेती क्षेत्र लावणीसाठी माणसे मिळत नाही म्हणून पडीक असल्याचे रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत पाहायला मिळत असताना, मुंबई विद्यापीठाने आपल्या एनएसएस उपक्रमात या भातशेती लावणी उपक्रमाचा सहभाग केल्यास या तीन जिल्ह्यांतील किमान रा.से.यो.चे १० हजार युवक या शेतांत उतरू शकतात आणि हजारो हेक्टर पडीक भातशेती फुलू शकते.

सातत्याने नावीन्याचा ध्यास घेतलेले नवनिर्माण महाविद्यालय शैक्षणिक क्षेत्रात तसे नवे आहे. शिक्षक आमदार कपिल पाटील आणि मी या समाजवादी युवकांनी सुरू केलेले हे महाविद्यालय नुकतेच दशकपूर्तीकडे वाटचाल करीत आहे. शासनाच्या विनाअनुदानित धोरणाच्या विळख्यात भरडले जात असतानाही या परिसरातील ग्रामीण गरीब विद्यार्थ्याला उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिलेल्या या महाविद्यालयाच्या माध्यमातून सतत नवनव्या उपक्रमाच्या संकल्पना प्रत्यक्षात राबवल्या जात असतात.

राष्ट्रीय सेवा योजना हा महाविद्यालयीन पातळीवर राबवला जाणारा उपक्रम महाविद्यालयीन विद्यार्थ्यांवर खऱ्या अर्थाने श्रमसंस्कार आणि मनसंस्कार करणारा आहे. वर्षभरातील कॅम्पमध्ये विद्यार्थ्यांनी श्रमाची कामे करावीत, ज्यायोगे विद्यार्थ्यांना श्रमाची प्रतिष्ठा समजावी आणि समाजाशी आपले नाते आणि ऋण व उत्तरदायित्वाची जाणीव व्हावी हा यामागचा हेतू असतो. गेली अनेक वर्षे रासे योजना (एनएसएस) माध्यमातून जे वार्षिक कॅम्प होतात त्यातून अनेक गावांतील रस्ते, पायवाटा, गावतळ्याची दुरुस्ती, छोट्या ओहोळांवर बंधारे, त्यातून पाणी अडवा-पाणी जिरवाचा संदेश, आरोग्यासंबंधी उपक्रम, त्याचबरोबर प्रौढ शिक्षण आणि जाणीवजागृती आयोजनाचे विविध उपक्रम राबवले जात आहेत. मात्र आज बदलत्या वातावरणात खेड्यापाड्यांनी कात टाकली आहे. शासनाच्या विकासाच्या विविध योजना ग्रामीण भागांपर्यंत पोचल्या आहेत. खेड्यापाड्यांत रस्ते तर पोचलेच, परंतु ते डांबरीकरणाचे प्रमाण मोठे आहे. पायवाटही उत्तमरीत्या बांधल्या गेल्या आहेत. तसे पाहायला गेले तर आज गावातून एनएसएस कॅम्पचे नियोजन करताना या मुलांना आठ दिवस श्रमदानाचे कोणते काम द्यायचे हा प्रश्न पडतो. त्यातही एक गाव किमान ३ वर्षे दत्तक घ्यावे लागते. मग अशा वेळी, सलग ३ वर्षे श्रमदान करता येईल आणि तेही १००




मुलांना आठ दिवस, म्हणजेच एका गावात एका वर्षाला ३२०० किमान श्रमतास म्हणजेच ३ वर्षांत किमान ९६०० श्रमतास काम असेल. असे सार्वजनिक श्रमदानाचे काम शोधावे लागते आणि हा ३ वर्षांचा प्रकल्प हाती घ्यावा लागतो. मात्र प्रत्यक्षात तसे काम आज गावात मिळणे अगदीच मुश्किल झाले आहे. त्यामुळे तरुणाईची ही श्रमशक्तीच योग्य प्रकारे उपयोगात येत नसल्याचे मत अनेक एनएसएस विभागप्रमुख व्यक्त करत होते.

नुकतेच मुंबई विद्यापीठाच्या नवनिर्माण महाविद्यालयाचे कोकण झोन एनएसएस वार्षिक नियोजनाचे सेमिनार संपन्न झाले. यावेळी प्रामुख्याने बदलत्या सामाजिक परिस्थितीनुसार कार्यक्रमांचे नियोजन करण्याची भूमिका अनेकांनी मांडली. या सेमिनारच्या उद्‌घाटनप्रसंगी मी सांगितले की, आज कोकणाचा विचार करता, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि रायगड या ४ जिल्ह्यांतून एनएसएसमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जवळपास १०,००० आहे. म्हणजेच जवळपास ३-४ लाख युवा श्रमशक्ती तास वर्षाला मिळतात. या श्रमशक्ती तासांचे योग्य नियोजन झाले तर त्यामधून फार मोठे काम उभे राहू शकेल. या तीन जिल्ह्यांतून १.५ ते २ लाख हेक्टर क्षेत्र भातशेतीच्या लागवडीखाली आहे. मात्र गेल्या १० वर्षांत भातशेती क्षेत्रातील अनेक शेते ही लावणीच्या हंगामात मजूर उपलब्ध होत नसल्याने तशीच पडीक राहिलेली दिसतात. त्याचे मुख्य कारण म्हणजे भातलावणीचा हंगाम हा फक्त १५ दिवसांचा असतो आणि त्या काळात मजुरांची उपलब्धता नसते.

एका बाजूला मोठ्या प्रमाणावर पडीक राहणाऱ्या भातखाचरांचा प्रश्न आणि दुसऱ्या बाजूला आपल्या हाती असणारे ४ लाख युवा श्रमशक्ती तास याची सांगड घातल्यास ही १०००० मुले कोकणच्या शेतात उतरतील तेव्हा शेतीचे रूपच पालटून जाईल. या दुय्यम मानल्या जाणाऱ्या शेतीला सळसळत्या चैतन्याचे तेज येईल आणि खऱ्या अर्थाने युवा शक्तीचा कृषी उत्पादनात्मक उपयोग होईल.

नवनिर्माण महाविद्यालयाच्या माध्यमातून पहिल्यांदा हा प्रयोग केला. त्यावेळी असे निदर्शनास आले की अनेक मुले-मुली ही त्यांच्या घरच्या पारंपरिक शेतीशी संबंधित होती. त्यांना भात-लावणीच्या कामाची उत्तम माहिती होती. नांगर धरणे, चालवणे यांत ती वाकबगार होती, तर काही मुलांना घरची शेती असूनही ती कधीच आपल्या शेताच्या लावणीत उतरली नव्हती. त्यांच्या पायाला चिखलाचा स्पर्श कधी झाला नव्हता आणि तो व्हावा याबद्दल त्यांना उत्सुकता नव्हती. मात्र महाविद्यालयाच्या माध्यमातून या उपक्रमात सहभागी होताना नाविन्याची ओढ आणि आविष्कार प्रत्येकाच्या कृतीतून जाणवत होता.

एनएसएस माध्यमातून भातशेती लावणीचा उपक्रम मुंबई विद्यापीठाने किमान या ३ जिल्ह्यांसाठी घेतल्यास कोकणातील बरीच भातशेती लागवडीखाली येईल आणि आज विशेषत: रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्ह्यात जे भात शेतीचे घटत जाणारे प्रमाण आहे आणि घरात लागणारा तांदूळही विकत आणण्याची वृत्ती वाढत आहे, त्या बदल्यात येथील भातपीकाचे उत्पादन वाढेल आणि धान्याच्या टंचाई आणि वाढत्या किंमतीच्या काळात येथील जनतेला तो एक मोठा आधार ठरेल. पर्यायाने राज्याचे भात-उत्पादनही वाढेल.

दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे कोकण हा मनिऑर्डर संस्कृतीवर जगणारा प्रदेश अशी त्याची ओळख होती. आज त्याचे स्वरूप बदलत चालले तरी शेती हे उत्पन्नाचे साधन असल्याची जाणीवजागृती आजही होऊ शकलेली नाही. या माध्यमातून या मातीशी नाळ जोडणारी आणि येथील शेतीशी बांधीलकी जपणारी विचार प्रबोधनाची चळवळ या माध्यमातून जोपासता येईल. याचा विचार करून मुंबई विद्यापीठाने एनएसएस माध्यमातून भातशेती लावणी प्रकल्प हाती घेणे कृषी उत्पादन, बायोडायव्हर्सिटी आणि युवा संस्कारासाठी फारच गरजेचे ठरणार आहे.

**अभिजित हेगशेट्ये**
abhijithegshetye@yahoo.com

# झपाटणारं पुस्तक

## डॉ. मेघश्री दळवी

कवितांचं एक वेगळंच विश्व असतं. त्यात डोकावून पाहताना आपण कधी आपल्या स्वतःच्या मनाचंच प्रतिबिंब पाहतो, कधी कवीच्या अंतरंगात डोकावण्याचा प्रयत्न करतो, आणि कित्येकदा कवीच्या संवेदनांच्या पलीकडे जाऊन मूलभूत जाणिवांची अमर्याद अनुभूती घेतो. हे सारे अनुभव अतिशय वैयक्तिक पातळीवर येतात. त्यामुळे कविता आणि त्यांचा रसास्वाद यावरची चर्चा वा समीक्षा एका व्यक्तीच्या दृष्टिकोनापुरती मर्यादित राहण्याची शक्यता असते. समीक्षेच्या वाचकांच्या मनाशी ती नेहमीच पोहोचेल आणि भिडेल याची शाश्वती नसते.

आजवरच्या अशा अनुभवाला एक वेगळाच छेद देणारं सरोज जोशी यांचं नवं पुस्तक आहे- 'झपाटलेली झाडे'.

सन १९८०-१९९० या काळातले मराठीतले चौदा प्रभावशाली कवी या संग्रहातून आपल्याला एका संपूर्ण रूपात भेटतात, भिडतात आणि अक्षरशः झपाटून टाकतात. अरुण म्हात्रे, सतीश सोळांकूरकर यांच्यापासून प्रकाश होळकर-नितीन तेंडुलकर यांच्यापर्यंतच्या या कवींनी मराठी कविता या दशकात अनेक अंगांनी बहरवली. त्याचा मोलाचा आढावा या प्रातिनिधिक संग्रहातून सरोज जोशींनी अतिशय कौशल्यानं घेतलेला आहे आणि मराठी कवितांचा तो सशक्त रसरशीत काळ या संग्रहातून पुन्हा एकदा जिवंत केला आहे.

लेखिका स्वतः कवयित्री आहेत आणि त्यांचे तीन कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्याव्यतिरिक्त कथा, विज्ञानकथा, समीक्षा, ललित लेखन, कथाकथन, सूत्रसंचालन, सामाजिक चळवळी, अशा अनेक क्षेत्रांत त्यांनी वाखाणण्यासारखी कामगिरी केली आहे. अनेकांनी त्यांच्या सूक्ष्म निरीक्षणाची आणि सखोल अभ्यासाची खास नोंद घेतलेली आहे. त्या संशोधनवृत्तीची प्रचिती या पुस्तकातून येते.

प्रत्येक कवीच्या कविता अनुभवताना, त्यातून कवीच्या व्यक्तिमत्त्वाचा घेतलेला वेध ही प्रत्येक लेखाची रचना फारच वेधक आहे. कवितांमधून लेखिकेच्या मनात कविमनाचं एक रूप उभं राहतं, त्याचा आयुष्याकडे बघण्याचा नजरिया उमजत जातो. जोडीनं मनात काही प्रश्न उभे राहतात आणि मग त्या झपाटलेल्या झाडाला भेटून-बोलून कवितेमागचा कवी समजून घेण्याचा प्रयत्न त्या करत राहतात. हा सर्व प्रवास पुस्तकात अतिशय सच्चेपणानं येतो. त्या प्रवासात, त्या शोधयात्रेत आपणही गुंतून जातो, गुंगून जातो आणि मनोमन त्या उद्धृत ओळींपल्याडचे अर्थ धुंडाळत राहतो.

सौमित्र, अरुणा ढेरे, प्रज्ञा पवार यांच्या कवितांचा आवाका मोठा, आणि तो वेळोवेळी त्यांच्या मुलाखतींमधून वा त्यांच्यावरच्या इतर चर्चा/लेखांमधून अनेकांनी मांडला आहे. सरोज जोशींच्या लेखांचं वैशिष्ट्य म्हणजे विचारलेले नेमके प्रश्न, आणि त्या अनुषंगानं या कवींनी आपलं मन मोकळं करून सांगितलेल्या भूमिका. त्यामुळे या लेखांना एक वेगळाच ताजेपणा आला आहे.

अशोक नायगावकरांचं कवी म्हणून एक परिपूर्ण 'प्रोफाईल' पेश करण्यात लेखिका यशस्वी झाल्या आहेत. नायगावकरांची खुसखुशीत उपरोधिक शैली आपल्या परिचयाची आहे, पण त्याही पुढे जाऊन त्यांच्या कवितांतील आंतरिक लय (अदा रे नादा रे), अध्यात्मामुळे आलेली निर्लेप वृत्ती (मी लढलो नाही), रसिक

प्रेम (प्रिये), सामाजिक जाणीव (भोपाळ- चिकित्सा) हे पदर त्यांनी अलगद, हळुवारपणे आणि सखोलपणे उलगडून दाखवले आहेत. कवीची तीव्र संवेदनाशील आणि त्याची तितकीच समर्थ अभिव्यक्ती नायगावकरांना अप्रतिम जमते याची या लेखातल्या उदाहरणांवरून वारंवार प्रचिती येते. पद्यातले पु.ल. म्हणून ज्यांचा गौरव केला जातो, त्या नायगावकरांना स्वतःच्या शैलीत अडकण्याचा धोका त्या योग्य वेळी लक्षात आणून देतात, असं म्हणायला हरकत नाही.

कवितेचं रसग्रहण करताना त्या कधी-कधी नेमका आशयाचा भाग घेतात (उदंड प्रेमी जन जगी, माझा मला मिळत नाही- नितीन तेंडुलकर) तर कधी कधी अख्खी कविताच आपल्या समोर मांडतात. (तुझा नीरव पायरव -महेश केळुसकर). त्यामुळे या पुस्तकातून वेचक कविता वाचण्याचा एक आनंद आणि जोडीनं एका रसिकानं तिचं मर्म अचूक उलगडून दाखवल्याचा दुसरा, असा दुहेरी आनंद मिळतो.


यातल्या सौमित्र, निरंजन उजगरे यांसारख्या एकेका कवीचा काव्यखजिना अभ्यासून पाहायचा म्हणजे एका प्रबंधलेखनाइतकी मेहनत हवी. अरुणा ढेरे

आणि प्रज्ञा पवार यांसारख्या भिन्न प्रकृतीच्या कवयित्रींची कविता आणि त्यामागची काव्यप्रेरणा उलगडायची म्हणजे तितकीच समर्थ लेखणी हवी. सरोज जोशींची ही दोन्ही शक्तिस्थळं या संग्रहातून ठसठशीतपणे दिसत राहतात.

विशेषत: 'बळीराजाचा उद्‌गार' या लेखातून कवी इंद्रजित भालेराव जितके समजतात, तितक्याच लेखिका सरोज जोशीही उमजतात. भालेरावांच्या सुरुवातीच्या ग्रामीण कवितांनी लेखिका भारावून गेल्या. डोळ्यांसमोर अस्सल गावरान दृश्य उभं करणाऱ्या या कवीच्या आणखी कवितांचा शोध त्यांनी जाणीवपूर्वक घेतला. मग हे कुतूहल त्यांना स्वस्थ बसू देईना, तेव्हा त्यांनी भालेरावांचा संपर्क मिळवून त्यांच्याशी थेट संपर्क साधला. कुतूहल, शोधन, संशोधन, अभ्यास या परिश्रमांना उत्तम लेखनाची सांगड घालत सरोज जोशींनी हा लेख लक्षवेधी केला आहे.

मूळची ग्रामीण कविता लिहिता लिहिता हा शेतकरी कवी आपल्या आईचं व्यक्तिचित्रही कसं तितक्याच ताकदीने उभं करतो, हळुहळू 'पीकपाणी'मधल्या पसायदानापर्यंत त्याची वाटचाल कशी होते, 'दूर राहिला गाव' यातून त्याची विद्रोही सामाजिक जाणीव कशी प्रकट होते, आणि 'टाहो'मधून ही जाणीव व्यापक रूप कसं धारण करते हे त्यांनी रंगवून सांगितलं आहे. एका कवीच्या काही कवितांच्या परिमाणापासून सुरुवात करत लेखिका त्या कवीला शोधत जातात आणि त्या कवीलाही ठाऊक नसेल अशी त्याची अधिकाधिक परिमाणं उकलून दाखवतात. हा शोधप्रवास मला अतिशय आवडला. तो लेखिकेला अपार आनंद देऊन गेला असणार हे त्या लेखातून ठायीठायी जाणवत राहतं. संशोधनाचा एका अमूर्त पातळीवरचा समाधानी आणि निखळ आनंद काय असतो हे या लेखात पाहावं.

नीरजांची कविता सरोज जोशी खूप डोळसपणे पण थोड्या अलिप्तपणे पाहतात.




**झपाटलेली झाडे**

सरोज जोशी

**ग्रंथाली प्रकाशन**

पृष्ठसंख्या २४७, मूल्य रु.२५०

नीरजांच्या कवितेत स्त्रीमनातल्या भावभावना आणि बंडखोर विचार कोणताही सामाजिक लगाम न ठेवता बेफामपणे येतात. शंकर वैद्यांना ती 'वेदनांची मिरवणूक' वाटते. तेंडुलकर नीरजांच्या कवितांविषयी म्हणतात, ''या कवितेतील स्त्रीला हवंय तरी काय, याचा मला उलगडा होत नाही.'' हे आधुनिक स्त्रीचं गोंधळलेपण नीरजा बेडरपणे मांडतात. आहे ते नको झालंय; पण काय हवं ते समजत नाहीय, ही उंबरठ्यावरची स्थिती म्हणजे अस्तित्वाचं भान येण्याची एक प्रखर सुरुवात असते हा नीरजांच्या काव्यप्रवासातली महत्त्वाचा टप्पा सरोज जोशींनी आणखी जास्त विस्तारानं, जास्त मोकळेपणानं मांडायला हवा होता असं वाटलं.

गझल हा सुरेश भटांनी लोकप्रिय केलेला काव्यप्रकार, १९८०-१९९०च्या दशकातल्या सदानंद डबीर आणि चंद्रशेखर सानेकर यांसारख्या कवींनी सहजतेनं आत्मसात केला आहे आणि एका खास उंचीवर नेऊन ठेवला आहे. त्याची दखल घेताना लेखिका गझलेचा सांगोपांग विचार करताना दिसतात. विशेषत: सानेकरांच्या गझलांमधील 'प्रश्नोपनिषद' आपल्यासमोर आणताना त्यांच्या रसग्रहणानं स्वत:ची अशी वेगळीच उंची गाठली आहे.

काही ठिकाणी मांडलेली मतं मात्र थोडी वादग्रस्त वाटतात. सदानंद डबीर जेव्हा म्हणतात, ''गझल जे जे मागेल, ते ते देत जावे लागते''

तेव्हा 'देत जावे लागते' यात लेखिकेला 'शिरजोरीचा, अनिच्छेचा अंश वाटतो.'

पण मला तसं वाटलं नाही. ज्या क्षणी ही ओळ आपण वाचतो त्या क्षणी ''देत जावे लागते'' हे झोकून देणं, आपल्या मर्जीचं असं काही न उरणं, हा नादावलेपणा, हे समर्पण - केवळ गझल वा या गझलकराइतकीच सीमित न राहता ती ओळ कविता आणि कवी यावर एक कालातीत आणि सर्वांगसुंदर भाष्य करून जाते.

हा संग्रह वाचता वाचता आपणही कवितांमध्ये खोलवर जाऊ लागतो, कवितेतली लहान लहान सौंदर्यस्थळं टिपू लागतो, मनोमन लेखिकेशी संवाद (आणि वादही) करू लागतो तेव्हा या संग्रहामागचं झपाटलेपण आपल्यापर्यंत पूर्ण ताकदीनिशी पोहोचतं हे निश्चितच.

उत्कृष्ट संपादन, देखणी मांडणी आणि आशयपूर्ण मुखपृष्ठ यामुळे ग्रंथालीच्या समृद्ध ग्रंथसंपदेत हे पुस्तक एक महत्त्वाची भर घालतं. समीक्षेवर जी काही मोजकी आणि उत्तम पुस्तकं मराठीत आहेत त्यांच्यामध्ये यापुढे 'झपाटलेली झाडे'चं नाव आवर्जून घेतलं जाईल.

---

**डॉ. मेघश्री दळवी**
९०४, योगी रेसिडेन्सी
न्यू लिंक रोड, बोरीवली (प),
मुंबई ४०० ०९१.
दूरध्वनी: ९८२०१ ४४६५७
meghashri_dalvi@hotmail.com

# तिसरी पिढी

## पुष्पा जोशी

साधारण चाळीस वर्षांपूर्वीची गोष्ट. विरारहून 'बडा-फास्ट' सुटली आणि दुसऱ्या वर्गाच्या बायकांच्या डब्यातल्या सर्व म्हणजे आम्हा सात-आठ जणींचे हात पूर्वेकडल्या डोंगराकडे पाहून 'जीवदानीला' नमस्कार करण्यासाठी जोडले गेले. वसईला चढलेल्या मिसेस् वाघ, फुर्टाडे, मेरी साऱ्या त्यांच्या ठरलेल्या जागी स्थानापन्न झाल्या. विणकाम, भरतकाम करणाऱ्या हातांबरोबर फुलांचे, खाऊचे वाटप झाले. पेपरच्या बातम्या, गप्पा यात रमल्यावर चर्चगेट फार लवकर आले असे वाटत असे. त्यावेळी नालासोपारा आणि मीरारोड या स्टेशनवर कुणीही चढत-उतरत नसे. बोरीवलीपर्यंत चढलेल्या प्रत्येकीला बसायला मिळे. विरारहून जोगेश्वरीला आल्यावर गोरेगाव लोकलच्या पहिल्या वर्गाच्या डब्यातही असाच छान ग्रूप जमला होता आणि त्या पळत्या घरात वाचन, भरतकाम, भोंडला, केळवणं, डोहाळंजेवण अशा कार्यक्रमात प्रवास आनंददायी होई.

आज आमच्या लेकी-सुनांना दिवसाच्या कुठच्याही वेळेला प्रथम किंवा द्वितीय वर्गाच्या डब्यात अक्षरश: घाम गाळून, दीड पायावर उभं राहण्याची कसरत करत ऑफिस गाठावं लागतं. त्यांची घरून निघण्याची वेळ बहुधा ठरावीक असते पण परत यायची वेळ मात्र त्यांच्या कामावर अवलंबून असते. बरोबर नेलेला डबा तरी वेळेवर खाता येईल की नाही याची शाश्वती नाही. प्रवासात बहुतेक जणी मोबाइलचे इअरफोन कानात अडकावून, गाणी ऐकत, बाकीच्या कोलाहलातून स्वत:ची सुटका करून घेतात. एक सरकारी नोकरी सोडली तर या युगात बाकीच्यांची 'थांबला तो संपला' हीच अवस्था.

आमची तिसरी पिढी साताठ किलो वजनाची, पाठीचा मणका ढिला करणारी दप्तरं सांभाळत शाळेच्या बसमध्ये एकमेकांना ढकलत प्रवास करत असते. रिक्षातून, छोट्या गाडीतून शाळेत जाणाऱ्या लहान मुलांची अवस्थाही अशीच असते. सारे नियम कागदावर मख्खपणे उभे असतात. मुलं घरी येईपर्यंत वाट पाहणं एवढंच आपल्या हातात उरतं. सहावीत असलेल्या सतेजला एका क्लाससाठी पोचवायला पार्ल्याला गेले होते. आज क्लास तसा पाऊण-एक तासाचा होता. तिथेच किती वेळ उभी राहणार? त्याच्या मित्रांच्या आयांना सांगून मी थोड्या अंतरावर एका बंद दुकानाच्या पायरीवर दिवाळी अंक वाचत बसले. क्लास अपेक्षेपेक्षा लवकर सुटला. वाचनातून बाहेर येऊन मला क्लासशी पोचायला थोडा उशीर झाला. त्याच्या मित्रांच्या आयांचे आभार मानून आम्ही रिक्षात बसलो. बरोबर आणलेली बिस्किटं, पाणी त्याला देऊन विचारलं, 'सतेज, फार वेळ थांबावं लागलं का? घाबरलास नाही ना?' उत्तर आलं, 'आजी, that is over now. तुला दुसरं काही बोलायचं असेल तर बोल.' ही आजच्या युगाची तिसरी पिढी. घडून गेलेल्या घटनेबद्दल उगाच चर्चा, विचार करत बसण्यापेक्षा, 'What is next?' असा आजच्या युगाला शोभेसा विचार करणारी.

हल्ली फूटपाथवर कुठल्यातरी नगरसेवकाच्या कृपेनं सिमेंटची बाकं बसवलेली असतात. अगदी सकाळी वरिष्ठ नागरिक फिरून आल्यावर जरा गप्पा मारायला, पेपर वाचायला, ऊन खायला त्यावर बसलेले दिसतात. काही चविष्ट वरिष्ठ मैदानाबाहेरच मिळणारे कसले-कसले 'आयुर्वेदिक' रस पिऊन झाले की तोंडाला चव आणण्यासाठी शेजारीच असलेल्या इडली-डोशाच्या गाडीवर ऑर्डर देऊन न्याहारीचं कामही करून घेतात. दुपारच्या निवांत वेळी बाकांची मजा असते. कॉलेजातून तास बुडवून किंवा क्लासच्या नावाखाली त्या बाकांवर तरुणाईचा कुजबुजता वावर असतो. स्वत:ला सिनेमातल्या हिरो-हिरोईनच्या जागी मानून नाक-डोळे उडवीत, केसांमधून हात फिरवत लाडानं लटकं बोलण्याची आणि एकमेकांच्या मोबाइलमधले मेसेज वाचण्याची गंमत चालू असते. तर कधी नोट बुक्समध्ये काही लिहिणं चालू असतं. काही वेळा मैत्रिणी-मैत्रिणी कुठे बसून बोलताना आढळल्या की दुचाकीवरील हिरोंची गाडी तिथून जोरात चकरा मारायला लागते आणि त्या मुलींच्या खोट्या रागाच्या कॉमेंटस् चालू होतात. या तरुणाईमुळे त्या सिमेंटच्या बाकांनासुद्धा थोडं ताजं-तवानं वाटतं. संध्याकाळी शाळा सुटायची वेळ झाली की मुलांना आणायला आलेल्या आया बाकांचा ताबा घेतात. मुलं आली की तिथेच बसून त्यांच्या वह्या पाहून, काही लिहायचं राहिलं असेल तर ते दुसऱ्या मुलांच्या वह्यांतून उतरवून घेतात. परीक्षेच्या वेळी तर मुलं परीक्षा संपून बाहेर आली की लगेच दुसरी 'घरगुती' परीक्षा सुरू! एका हातात प्रश्नपत्रिका धरून 'चुकीचं कसं लिहिलंस?' म्हणून विचारत, पाठीवर धपाटे घालत 'पंचनामा' सुरू होतो. शाळा तासा-दीड तासानं सुटणार असेल तर मुलांना पोचवायला आलेल्या आयांचं तिथेच बाकावर बसून साडीला फॉल-बिडींग करणं, टिकल्या लावणं, प्लॅस्टिकच्या फुलांचे हार करणं वगैरे उद्योगही चालू असतात. स्वस्थ बसून सिमेंटचा बाक 'तीन पिढ्या' पाहत राहतो.

जोगेश्वरी व आजूबाजूला रात्रीच्या


वेळी ‘कुल्पीऽऽय’ असं ओरडत ‘बाबाजी’ येत असे. कुल्फी घेताना, बाबाजींशी गप्पा मारताना कळलं की हे लोक मूळचे पुण्याजवळचे, लोणी-काळभोरचे. पावसाळ्यात शेतीसाठी चार महिने गावी जायचं. इतर वेळी गाववाल्यांसोबत अंधेरीला एका खोलीत राहून हा उद्योग करायचा. सकाळीच दूध आणून-आटवून कुल्फीची भांडी मडक्यामध्ये बर्फात लावून ठेवायची. संध्याकाळी विक्रीसाठी बाहेर पडायचं. बाबाजी थकल्यावर त्यांचा मुलगा ‘अंकुश’ कुल्फी विकायला येऊ लागला आणि आता त्याचा मुलगा समीरही तेच करतो. फरक एवढाच, की समीरनं आता त्याचा मोबाइल नंबर आम्हाला दिला आहे. जरुरीप्रमाणे फोन केला की हजर. बाकी तीस वर्षांची कुल्फीची चव व दर्जा तोच. कधी कुल्फी खराब निघाली नाही की बाधली नाही. तिसऱ्या पिढीकडे संक्रमित झालेलं धंद्यातलं ‘ट्रेड सिक्रेट’ जपून गावरान आपुलकीतील ओलावा तोच आहे.

एकदा मी सकाळी फिरून येऊन बाकावर बसले होते. कचरा गोळा करणारी एक साधारण पस्तिशीची बाई ठरावीक वेळेला तिथून जाते. प्लॅस्टिकची पांढरी पोती उसवून, शिवून त्याची मोठी पांढरी झोळी तिच्या पाठीवर टाकलेली असते. हातातल्या लांब लोखंडी कांबीनं तिच्या उपयोगी कचरा उचलून झोळीत टाकण्याचं तिचं काम चालू असतं. या बाईला मी, तिच्या लहानपणा-पासून पाहत होते. गोऱ्या-गोमटच्या कपाळावर हिरवं गोंदण असलेली ती, तिच्या आईबरोबर आमच्या बिल्डिंगमध्ये ‘आवस वाढा होऽऽ’, आणि दे दान सुटे गिरान’ म्हणत येत असे. इतर वेळी कचरा गोळा करायचा उद्योग ती तिच्या आईबरोबर करत असे. आईच्या वृद्धत्वामुळे त्या येईनाशा झाल्या. आमचंही अमावस्या, ग्रहणाला दान देणं थांबलं. ही मुलगी कचरा गोळा करता करता मोठी झालेली अशी रस्त्यात दिसत असे. पण त्या दिवशी मी, तिच्याबरोबर ‘तिला’ पाहिलं आणि अंगावर सरसरून काटा आला. ‘ती’ म्हणजे तिची नऊ-दहा वर्षांची मुलगी आज तिच्याबरोबर होती. तसाच गोरा-गोंदलेला चेहरा, आईसारखीच पाठीवर झोळी आणि हातात लांब कांब. मायलेकी आजूबाजूला पाहत त्यांच्या उपयोगी वस्तू सळीनं पाठीवरच्या झोळीत टाकत होत्या. ‘ती’ सुद्धा तिसरी पिढी. स्वातंत्र्याची साठी ओलांडल्यानंतरही अशा ‘दुर्दैवी तिसऱ्या पिढी’साठी काही न करू शकल्याची खंत मनाला सतावत राहिली.

---

**पुष्पा जोशी**
१२/१३, पुष्पकुंज कॉ. हौ. सो.,
नटवर नगर, रोड नं.३, जोगेश्वरी (पूर्व),
मुंबई - ४०० ०६०.
फोन : २८२३०४४२
मोबाइल : ९९८७१ ५१८९०
pushpajoshi56@gmail.com

**नवीन आवृत्ती नव्या मुखपृष्ठासह**




आज टॉवरसंस्कृतीच्या विळख्यात जात चाललेल्या ‘लालबाग’चा गेल्या आठ दशकांचा सामाजिक इतिहास साकारलेला हा ग्रंथ एक उल्लेखनीय दस्तऐवज ठरणार आहे...

**लालबाग**

**आदिनाथ हरवंदे**

मूल्य : ४०० रुपये
सवलतीत : २४० रुपये
घरपोच २७० रुपयांत!